"आपले मंडळ"

|| *Maharashtra Mandal of Detroit* ||

स्नेहबंध

एप्रिल गुढी पाडवा
२०१८ विशेषांक

The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

अनुक्रमणिका

1	अध्यक्षीय	अनघा हुपरीकर	पान 4
2	सामन्याचा असामान्य “कॉमन म्यान”	बाळकृष्ण पाडळकर	पान 5
3	माझी सहप्रवासी मैत्रीण	डॉ. स्वाती संजय कर्वे	पान 8
4	बंडूदादा	सिद्धार्थ शास्त्री	पान 14
5	समृद्ध चैतन्य	सुशांत खोपकर	पान 21
6	गुणी!	अपूर्वा भिडे	पान 24
7	विनम्र अभिवादन	राजेंद्र वाणी	पान 27
8	जैचई	सुरेश नायर	पान 29
9	Colorful Egg-shaped Cakes for your Little Bunnies!	Ketaki Joshi	पान 31
10	गझलकार सुरेश भट	मानिनी देशपांडे	पान 34
11	मी पाहिलेला संभा मामा	मयुरा कापसे	पान 36
12	My Son the Rock Star – An Immigrant's Diary	Rajeev Kalamdani	पान 38
13	रसिका तुझ्याचसाठी	ज्योत्स्ना दिवाडकर	पान 41
14	फेरीवाला	सुषमा सुखटणकर	पान 42
15	तो राजहंस एक.....!	सरोज जावकर	पान 45
16	घमासान लढाई - नमस्कार या शिवरायाला	निरंजन हुंबड	पान 48
17	बडबडभवानी	वीणा शाह	पान 49

संपादक:

उमा कानडे, संजय मेहेंदळे, ज्योत्स्ना दिवाडकर
सुशांत खोपकर, ऋतुज देशपांडे

मुखपृष्ठ रचना व मांडणी:

मानसी डहाणूकर

अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!!

हे वर्ष सुरु झाल्यापासून आपला Volunteering Event at Gleaners, संक्रांत कार्यक्रम 'यादों की बारात' आणि आपल्या Youth committee ने केलेला 'Kids Movie Night ' असे हे तीनही कार्यक्रम अत्यंत उत्तम पार पडले.

आज आता आपला गुढीपाडव्याचा कार्यक्रम! बाहेर उभी केलेली गुढी, सत्यनारायणयाची पूजा अशा या पवित्र, प्रसन्न आणि मंगलमय वातावरणात आज बासरीचे सूर आपल्याला एका वेगळ्याच जगात घेऊन जाणार आहेत. अमर ओक हे पुण्याचे प्रसिद्ध बासरीवादक आपल्यासाठी 'अमर बन्सी' हा त्यांचा कार्यक्रम घेऊन आले आहेत. इतका सुंदर आणि सुरेल कार्यक्रम अमेरिकेत आणल्याबद्दल बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मी आपल्या मंडळातर्फे मनापासून आभार मानते.

यानंतर ४ मे, २०१८ रोजी एक उत्तम वक्ते असलेले राहुल सोलापूरकर यांचं स्वामी विवेकानंदांवर आधारित व्याख्यान MMD आयोजित करत आहे. 'भारत विकास परिषद' ह्या संस्थेसाठी; विशेषतः 'अपंग निर्मूलनासाठी' राहुल सोलापूरकर या व्याख्यानांच्या माध्यमातून निधी जमा करायचं काम करत आहेत. अशा या चांगल्या कार्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमास आपण सर्वजण भरभरून प्रतिसाद द्याल ह्याची मला पूर्ण खात्री आहे. कार्यक्रमाची सविस्तर माहिती लवकरच आम्ही तुमच्यापर्यंत पोहोचवू.

मे महिन्यातच १२ तारखेला आपली या वर्षीची Carrom Tournament आयोजित करण्यात आली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती फेसबुक आणि ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.

आपल्या सर्वांना माहीतच आहे की आपलं मंडळ टॅलेंटेड लोकांनी ओतप्रोत भरलेलं आहे. पण महत्वाचं म्हणजे त्यांच्या टॅलेंट ला वाव देणारी, त्यांना सतत प्रोत्साहन देणारी मंडळीही भरपूर आहेत. त्यातलेच एक आपले सुभाष काका!! बऱ्याच दिवसांत आपल्याकडच्या नाट्यप्रेमींना स्टेजवर काम करताना पाहिलं नव्हतं, म्हणून सुभाष केळकरांना एक नाटक बसवायची विनंती केली आणि त्यांनी ती लगेच मान्यही केली. तर दिनांक ३० जून रोजी आपल्यातल्याच उत्तम हौशी कलाकारांना घेऊन सुभाष काकांनी बसवलेलं नाटक बघायला नक्की या. Stay tuned for more details!!

या वर्षाच्या प्रत्येक महिन्यात MMD चा काही ना काही कार्यक्रम ठेवायचा आपण प्रयत्न करत आहोत! जून नंतर जुलै मध्ये तर धमाल..,..आपली वार्षिक सहल!! १५ जुलै ला Kensington Park मध्ये आपण सगळे परत एकत्र भेटणार आहोत आणि भरपूर मजा करणार आहोत !!

या सगळ्यात हळूहळू आपलं हे वर्ष कुठे संपून जाईल कळणारदेखील नाही. पण या सगळ्या आठवणी मात्र सतत बरोबर राहतील एवढं नक्की!!

नेहमीप्रमाणेच, तुम्हाला काहीही प्रश्न असतील, सूचना असतील तर त्या मला जरूर कळवा.

आपली विश्वासू,

- अनघा हुपरीकर

अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ, डेट्रॉईट २०१८

सामन्याचा असामान्य “कॉमन म्यान”

आर. के. लक्ष्मण, रेषांचा अनभिषिक्त राजा, दोन पिढ्यांपेक्षा जास्त भारतीयांवर अधिराज्य गाजवणारे अजोड व्यंगचित्रकार काळाच्या पडद्याआड गेले. सगळ्यांनाच पडद्याआड कधी न कधी जावेच लागते, पण जाताना आपला कायमस्वरूपी ठसा उमटवून जाणारे सगळेच नसतात. ‘कॉमन म्यान’ या मानसपुत्राला मागे सोडून आर के पुन्हा परत न येणाऱ्या वाटेने कायमचे निघून गेले.

त्यांच्या पाच दहा रेघांच्या कलाकृतीने मात्र ते कायम सर्व सामान्यांच्या मनात घर करून राहिले आहेत. प्रज्ञावंत संपादकांनाही अक्षर प्रपंच करून जे जमले नाही त्याचे विवेचन लक्ष्मण त्यांच्या छोटेखानी व्यंगचित्रात करण्यात सिद्ध हस्त होते. त्यांच्या कॉमन म्यानने ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत निर्धोक प्रवास केला व आपल्या मूक अभिनयाने प्रसंगाचे गांभीर्य अथवा खेळकरवृत्ती वाचकांपर्यंत सहज पोहोचवली. भाराभार पाने लिहूनही वाचकांच्या गळी न उतरणाऱ्या कित्येक गहन गोष्टी आरकेंनी त्यांच्या रेषारूपी भाषेतून सहज सुलभ करून वाचकांसमोर ठेवल्या.

इंदिरा गांधीच्या कारकिर्दीत बिहारमध्ये काँग्रेसचे अब्दुल गफूर हे मुख्यमंत्री होते. अल्पमतातील मुख्यमंत्री असल्यामुळे विरोधी पक्ष अथवा मित्र पक्ष फार क्षुल्लक कारणांवरून त्यांचा पाठींबा काढून घेण्याचा त्यांना दम देत असत. बिचारे गफूर सदानकदा प्रधानमंत्र्यांना फोन करून सद्य स्थिती सांगून आपली पदावर राहण्याबद्दलची काळजी व्यक्त करीत. प्रधानमंत्री इंदिरा गांधीचे त्यांना फोन वरून एकच सांगणे असे "आप बने रहो! हमारा आपको समर्थन है !" पुढे गांधी पश्चिम बंगाल व आसामच्या सीमावर्ती राज्यांच्या दौऱ्यावर दोन तीन दिवसांकरता होत्या. काही अपरिहार्य घडल्यामुळे गफूरना राजीनामा देण्याकरता दवाब आणला गेला. आरकेंनी याप्रसंगी मोठे मार्मिक व्यंग चित्र काढून वाचकांचे मनोरंजन केले. व्यंगचित्रात गफूर इंदिरा गांधीला त्यांच्यावर आलेल्या प्रसंगाची माहिती देण्यासाठी फोन करतात. इंदिरा गांधी सीमावर्ती राज्यांच्या दौऱ्यावर असल्यामुळे त्यांच्या ऑफिस मधील चपराशी फोन उचलतो, बाई नेहमी गफूरना काय सांगतात हे त्याला माहीत असते. फोनवर उत्तर देताना तोही गफूरना तेच सांगतो "आप बने रहो! हमारा आपको समर्थन है!"

दुसरा एक प्रसंग. त्यावेळी भारतीय क्रिकेटला चांगले दिवस नव्हते. सामने जिंकण्यापेक्षा हरण्याकडेच त्यांचा कल असे. मात्र त्याच काळात भारताचे हॉकीवर प्रभुत्व होते. कॉमन म्यान आणि त्याची पत्नी क्रिकेटचा सामना पाहायला जातात. सुरवातीचे भारतीय फलंदाज ढेपाळतात. नवीन फलंदाज कॉमन म्यान व त्यांच्या पत्नी ज्या ठिकाणी बसलेल्या असतात त्याठिकाणापासून मैदानात फलंदाजी करण्याकरता चाललेला असतो, कॉमन म्यानची पत्नी आपल्या जवळील हॉकी स्टीक त्या फलंदाजाच्या पुढे करून म्हणते "ट्राय विथ धिस , यंग म्यान, आफ्टर ऑल वुई आर बेटर इन धिस "फलंदाज मात्र खजील होतो .

एका व्यंगचित्रात दोन भिकारी फुटपाथवर भीक मागत बसलेले असतात. रुपयाचे डॉलरच्या तुलनेत बरेच अवमूल्यन झालेले असते. त्यामुळे या दोन्ही भिकाऱ्यांनी आपल्या बाजूला इंग्रजीमध्ये पाटीच लावून टाकलेली असते. या पाटीवर पुढील अक्षरे लिहिलेली असतात "वुई डोन्ट एक्सेप्ट लेस द्यान टेन रुपीज ." कॉमन चा निर्विकार चेहरा या ठिकाणी दाखवायला लक्ष्मण विसरले नाहीत.

प्रसंग विमानतळावरचा . नेहमीचीच लेट होणारी आंतरराष्ट्रीय उड्डाणे. विशेषतः भारतीय उड्डाणे. यावेळी निवेदिका प्रवाशांकरता निवेदन करते ,"We regret that flight no. ....is running behind schedule, passengers will be served tea and breakfast at nine o'clock, lunch at twelve o' clock, tea and coffee at four o' clock and dinner at seven....We are thankful to the passengers for their patience." कॉमन म्यान निवेदिकेकडे आ वासून पाहत असतो.

आर के लक्ष्मणने आपल्या व्यंगचित्रातून फक्त समाजातील वैफ़ल्येच वेशीवर टांगली नाही, तर लहान माणसाचा मोठेपणा, मानवता यांचेही दर्शन त्यांनी आपल्या व्यंगचित्रातून घडवले. कॉमन म्यानला एक भिकारी गुजराथमध्ये आलेल्या पुराकरता मदत करताना दाखवून लक्ष्मणने त्याच्या तोंडी खालील वाक्य टाकले आहे, "Here, at a time like this, nothing is too small." शहरातील गर्दीला , रस्त्यातील दुर्दशेला वैतागून एक धनाढ्य माणूस कॉमन म्यानला पायी चालण्याचे कारण फार मार्मिक पद्धतीने सांगतो . तो म्हणतो "Of course, I have a car, but I don't have a road to drive it "

एका चित्रात एका धरणाला गेलेले तडे पाहण्यासाठी मिनिस्टर येणार असतात. कॉमन म्यान तेथील इंजिनिअर सोबत असतो. धरणावर असलेल्या भिंतीवर खूपच आरास केलेली असते. फुलांचे तोरण , लहान दिव्याच्या माळा, वगैरे. कॉमन म्यान ज्यावेळी चौकशी करतो की इथे काय कार्यक्रम आहे , धरणाचे उद्घाटन आहे का ?तेव्हा इंजिनिअर उद्गारतो "No no, it is not yet ready for official opening, some ministers are coming to see the crack in the dam ".

प्रणब मुखर्जी अर्थमंत्री असतांना IMF कडे भारतासारख्या काही विकसनशील देशांकरता अर्थ सहाय्य मागण्यासाठी IMF कार्यालयात १९८४ साली डेलिगेशन घेवून गेले.परंतु IMFने काही राष्ट्रांच्या दबावाखाली येवून अर्थसहाय्य नाकारले. त्या प्रसंगी काढलेले व्यंगचित्र मोठे बोलके आहे , IMFच्या दाराशी बँकेचा अधिकारी विकसनशील देशांना हुसकून लावण्याच्या पवित्र्यात उभा आहे, त्याच्या तोंडी खालील वाक्य आहे "लोन ,लोन ,लोन ! व्हाट डू थिंक धिस इज ? ए काइंड ऑफ इंटरनेशनल मोनेटरी फंड टू गिव्ह लोन्स टू पुअर , डेव्हलपिंग कंट्रीज?"

आपत्कालीन काळात इंदिरा गांधीवर काढलेल्या व्यंगचित्रांमुळे बाई फार नाराज झाल्या होत्या. लक्ष्मणच्या व्यंगचित्रांनी त्यांना सळो की पळो केले होते. शेवटी बाईंनी त्यांच्या व्यंगचित्रावर अंशतः बंदी आणली आणि त्यांचे थोरले भाऊ आर. के नारायण यांच्या मार्फत लक्ष्मणला समज दिली. सगळ्या पक्षांना

पायाखाली तुडवून स्वतः हुकुमशहा प्रमाणे वागणाऱ्या इंदिरा गांधींची कित्येक व्यंगचित्रे त्यांनी काढली, मात्र बंदीला कंटाळून त्यांनी काही काळ देशत्याग केला .

सर्वश्रुत सलमान खानने फुटपाथवर झोपलेल्याना आपल्या कारने चिरडल्याच्या प्रसंगावर लक्ष्मणने मोठे बोलके व्यंगचित्र काढले होते जे वाचकांच्या आजही स्मरणात असेल. फुटपाथवर झोपणाऱ्या एकाने रस्त्याच्या मध्यभागीच रात्री पथारी लावली. ड्युटीवर असलेल्या हवालदाराने त्याला म्हटले, “Safer to sleep in the middle of the road than on the pavement, these days!"

असे कितीतरी बोलके पण थोडक्याच रेघांमध्ये संपूर्ण आशय सांगणारे व्यंगचित्रे लक्ष्मणने वाचकांच्या समोर ठेवली, ज्याचा वाचकांना कधीही विसर पडणार नाही. RIP, Laxman..

- **बाळकृष्ण पाडळकर**

माझी सहप्रवासी मैत्रीण

मी बसच्या खिडकीला डोकं टेकून पेंगत होते. सकाळी सकाळी उठून एका बसच्या प्रवासानंतर ही दुसरी बस होती. ही युनिव्हर्सिटीची बस होती. त्या स्टॉप पर्यंत यायला मला रोज एक किंवा दोन बस करायला लागायच्या. म्हणजे रोज युनिव्हर्सिटीला जायला मला सकाळी दोन तीन बस आणि संध्याकाळी दोन तीन बस घ्याव्या लागायच्या. त्याला इलाज नव्हता. बेंगलोर मध्ये तेव्हा बसेस कमी होत्या आणि माझी युनिव्हर्सिटी खूपच दूर होती. युनिव्हर्सिटीला पोहोचायला ही बस अजून पाऊण एक तास घेणार होती. रखडत रखडत असंख्य सिग्नल्सना थांबत थांबत ती सिटी-मार्केटच्या स्टॉप पाशी आली, एक मोठ्ठा धक्का देऊन थांबली. इथेच रोज जास्त गर्दी चढायची. मी खिडकीतून बाहेर बघत होते. त्या दिवशी मला चढणाऱ्यांच्या गर्दीतून पुढे ढकलत ढकलत एक मुलगी चढताना दिसली. आणि जणू दुसऱ्या मिनिटाला ती माझ्याच सीट पाशी येऊन उभी होती.

खास दाक्षिणात्य काळा वर्ण. बारीक निमुळता चेहेरा, उंचीला साधारण पाच फूट. "हाडकुळी" म्हणण्याइतकी सडपातळ, तरी सुद्धा त्या हाडांची ताकद दिसून येत होती. हातात तीन-चार लॅबोरेटरीच्या वह्या. खांद्यावर पुस्तकांची जड पिशवी. केसांची कंबरेपर्यंत पोहोचणारी वेणी, आणि अतिशय साधी अशी नायलॉनची साडी, ती सुद्धा अगदी खेडेगावात नेसतात त्या धर्तीवर नेसलेली! कपाळाला एका छोट्या टिकली शिवाय चेहेऱ्यावर कुठलाही मेक-अप नाही. आणि त्या काळ्या वर्णात लुकलुकणारे सतेज डोळे!

माझ्या जवळची जागा रिकामी होती. ती सीटवर बसता बसता माझ्याकडे बघून हसली तेव्हा तिचा चेहेरा तिच्या हास्याने उजळून गेला. मी पण जरा सरकून तिला जागा दिली. कॉलेज सुरु होऊन काही दिवस झाले होते. ही मुलगी कधी बसमध्ये आधी दिसली नव्हती. पुस्तक आणि पिशवी सारखी करत ती डायरेक्ट माझ्याशी कानडीत बोलायला लागली, तशी माझी दांडीच उडाली.

"तुझं नाव काय"? तिनेच प्रथम मला विचारलं.
मी: "स्वाती".
"कुठल्या कोर्स मध्ये आहेस"?
मी: "सायकॉलॉजी"
"कुठली शाखा"?
मी: "क्लिनिकल"
तिच्या चेहेऱ्यावर आनंद झळकला. "मी पण तुझ्याच कोर्स मध्ये आहे"! ती म्हणाली.
मी तिच्याकडे बघून हसले आणि मान डोलावली. तिच्या फाडफाड कानडीपुढे माझ्या फाडफाड इंग्रजीचा काही उपयोग नव्हता!
"तू दिसली नाहीस कधी क्लास मध्ये"! मोडक्यातोडक्या कानडीत मी तिला विचारलं
ती: "हो. मी उशीरा जॉईन केलं. मी वेटलिस्टवर होते... आणि बरंच काही मला करायला लागलं"!
मी: "तुझ नाव काय"?
ती: "गजम्मा"
गजम्मा! या मुलीच नाव "गजम्मा" ऐकून मी थक्क झाले. "गज" या शब्दाशी असल्या अंगकाठीच्या व्यक्तीचा काहीही संबंध नव्हता! "*नाव सुलोचना दोन्ही डोळ्याने दिसेना*" माझ्या मनात ही म्हण आली, आणि थोडी मजा वाटली. पण तिच्या त्या गंभीर, तरी आनंदी चेहेऱ्याकडे बघून मला तिच्या बद्दल उत्सुकता निर्माण झाली. ही कोण गावठी मुलगी आहे? फक्त कानडीत बोलते. क्लिनिकलचा कोर्स कसा काय करणार? माझ्या डोक्यात अनेक विचारांनी गर्दी केली. पण मी काही तिला विचारलं नाही. रोज गजम्मा सिटीमार्केटच्या स्टॉपला चढायची. माझ्या जवळची जागा मी

तिच्यासाठी राखून ठेवायचे. माझ्या स्टॉपवर चढणाऱ्या मैत्रिणींना मी सांगितलं होतं की गजम्मा साठी मी सीट धरते. तुम्ही दुसरीकडे बसा. तिच्या अस्खलित कानडी आणि माझ्या अस्खलित कानडी-मिश्रित-इंग्रजी अशा भाषांमधून आमचा रोज संवाद रंगायचा. कधी कधी ती बस मध्ये चढायची नाही, पण युनिव्हर्सिटीत दिसली की सांगायची की दुसऱ्या बसने आले.

गजम्मा कॉलेजला यायची, वर्गात बसून जमेल तशा नोट्स घ्यायची, बरेचदा कुठेतरी लायब्ररी मध्ये, किंवा कुठल्या तरी प्रोफेसर कडे जाऊन शंका विचारत बसायची. तशी वर्गात ती माझ्या "ग्रूप" मध्ये कधीच नव्हती. माझ्या इतर मैत्रिणी खूपच वेगळ्या होत्या. माझी खास मैत्रीण तर मंगलोर मधून आलेली तुळु भाषा बोलणारी ख्रिश्चन मुलगी होती. गजम्मा इतर कानडी बोलणाऱ्या मुलींमध्ये जास्त असायची. ती सगळ्यांशीच चांगलं वागायची. नम्र आणि मदत करणारी होती, परंतु कुणाच्याच फारशी जवळ नव्हती. माझ्याशी तिची दोस्ती हे इतरांना एक गूढ होतं. पण मला वाटतं बस मधल्या गप्पांमुळे तिची आणि माझी चांगली मैत्री झाली होती. आणि तिच्या बद्दल जसं जसं मला कळायला लागलं, तसं माझा तिच्याबद्दलचा आदर वाढायला लागला होता. खरंच, एकेकाच्या पदरात काय काय पडतं नाही? तिची गोष्ट म्हणजे एखाद्याचा फक्त निरंतर आशेवर चाललेला प्रवास होता!

गजम्मा आमच्या वर्गातल्या इतरांपेक्षा थोडीशी वयाने मोठी होती. बीए केल्यानंतर तिने बी.एड केलं होतं. एक दोन वर्ष शाळेत शिकवलं पण होतं. पण एम्.ए केल्यावर अजून चांगली संधी मिळेल किंवा अजून चांगली नोकरी मिळेल या हेतूने तिने युनिव्हर्सिटीत सायकॉलॉजी मध्ये प्रवेश घेतला होता. तिच्या चिकाटीची कमाल होती. ती सगळं काही कानडी माध्यमातून करत होती. त्यासाठी तिला बेंगलोर मधल्या "महाराणी" महिला कॉलेज मधून पुस्तकं आणायला लागायची. म्हणून घरी जाताना ती बऱ्याच आधीच्या स्टॉपवर उतरून तिकडे त्या कॉलेज मध्ये जायची. कधी शनिवार गाठून म्हैसूर विश्वविद्यालयात जायची, जिथे तिला कानडी भाषेत लिहिलेली सायकॉलॉजीची पुस्तकं मिळायची. एवढी सगळी धडपड फक्त शिकण्याच्या जिद्दी साठी!

असेच दोन तीन आठवडे गेले असतील. एक दिवस सोमवार होता. सकाळी युनिव्हर्सिटीला जाताना गजम्मा मला म्हणाली "मी आज संध्याकाळी 'निमहान्सला' जाणार आहे". आमच्या बसमधून उतरून तिथे जायला वेगळी बस लागायची. निमहान्स हे भारतातलं सर्वात मोठं मानसशास्त्रीय व न्यूरॉलॉजि या क्षेत्रातलं राष्ट्रीय सरकारी हॉस्पिटल आहे. अख्ख्या भारतातून असंख्य आजारी लोक तिथे उपचारासाठी येतात.
"का"? मी आश्चर्याने विचारलं
"अगं माझ्या आईला काल ऍडमिट केलंय. माझ्या आईला मणक्याचा त्रास आहे ना, ती जास्त काम नाही करू शकत..... कधी कधी उभी पण नाही राहू शकत. तिचा तिथे उपचार चाललाय. सरकारी आहे ना...थोड्या कमी खर्चात होतं"
मी गजम्माकडे अवाक दृष्टीने बघत राहिले. तिने कधी तिच्या आईला त्रास आहे, किंवा असं काहीच कधी सांगितलं नव्हतं.
"घरात कोण करतं"? मी विचारलं
"माझ्याबहिणी आहेत. माझ्याहून दोघी लहान आहेत, पण त्या सांभाळतात. त्यांचं कॉलेज जरा जवळ आहे. मी तर सकाळी साडेचारला बाहेर पडते ना...इथे सिटी मार्केट जवळ दोन ट्युशन आहेत. मी माझ्या गावातून बस पकडून तिथे जाते. मुद्दाम युनिव्हर्सिटीच्या वाटेत आहे म्हणून हे काम घेतलं. मग मी ही बस पकडते". तिचं हे ऐकून काय बोलावं सुचलं नाही. "तुला काही मदत हवी आहे का"? मी विचारलं.
"नाही. आत्ता नको. बघू डॉक्टर काय म्हणतात ते" शांतपणे ती म्हणाली. तिच्या शांतपणाचं मला नवल वाटलं.
"आणि तुझे बाबा - ते पण येऊ शकतील ना - म्हणजे हॉस्पिटल मध्ये आईपाशी थांबायला"? मी म्हणाले.
ती काहीच बोलली नाही. जरा हताश नजरेने तिने माझ्याकडे पाहीलं
"काय?".... माझा प्रश्न अर्धवट राहिला.

"ते नाहीसे झालेत"
"काय!?" परत मी थोडं जोरात म्हटलं - हे अगदी अनपेक्षित उत्तर होतं...
"हो... एके दिवशी त्यांना फॅक्टरीमध्ये ऍक्सिडेंट झाला, डोक्याला मार लागला. ते घरी आले. डॉक्टरने औषध दिलं होतं, दोन दिवस व्यवस्थित होते - म्हणजे डोकं दुखत होतं मार लागला तिथे, पण तसे ठीक होते. पण तिसऱ्या दिवशी जे कामावर गेले ते आजपर्यंत घरी आले नाहीयेत. आम्ही सगळं केलं, पोलीस झाले, तक्रारी झाल्या, पेपरांमध्ये निवेदनं झाली....काही नाही. रोज वाट बघायचो... खूप वाट बघितली. रात्र रात्र झोप नव्हती. आमच्या गावात पण लोकांनी शोधलं त्यांना. कुठेच पत्ता नाही. डॉक्टर म्हणाले डोक्याला मार बसल्यामुळे विस्मरण झालं असणार".
मी गजम्माचा फक्त हात घट्ट धरला...माझीच छाती ते ऐकून धडधडत होती. तिच्या डोळ्यात थोडे अश्रू तरळले होते पण लगेचच ती पुढे बोलली. "याला चार वर्षं होतील. आम्हाला सवय झालीये. येतील कधीतरी ते परत.... नशीब, वाचले तरी ऍक्सिडंट मधून..." तिने विषय बदलला

आजारी आई, दोन लहान बहिणी, नाहीसे झालेले वडील, हिच्यावर सगळी घराची आर्थिक जबाबदारी होती! त्यातून ही मुलगी ट्युशन करून युनिव्हर्सिटीला यायची, कानडी माध्यमातली पुस्तकं शोधायला वण वण फिरायची... माझ्या स्टॉप वरच्या एक दोन मुली दोन-दोन बस पकडण्यावरुन कधी कधी खूप कटकट करायच्या. त्यातली एक वाणी नावाची अतिशय लाडावलेली कन्या. तिची तर रोज तक्रार. कालच्या पार्टीमुळे झोप झाली नाही, आणि बस पकडायला आज लवकर उठायला लागलं, अशी कुठली ना कुठली तरी श्रीमंत तक्रार रोज असायची. रोज मी थोड्या सहानुभूतीने ऐकायचे. आम्हाला सगळ्यांनाच कष्ट वाटायचे. पण गजम्माच ऐकल्या नंतर एक दिवस मी वाणीला म्हटलं "आपल्याला अजिबात अधिकार नाही कटकट करायचा. ती गजम्मा सकाळी साडेचारला घर सोडून चार-चार बसेस घेऊन येते आणि जाते. तिच्याकडे बघा जरा...तुम्ही किती सुखी आहात हे लक्षात येईल". या पोरी कोणी गजम्माशी जास्त बोलायच्या नाहीत. एक तर सगळ्या वेगवेगळ्या कोर्सेस मध्ये होत्या, त्यामुळे एरवी कधी त्या तिला भेटायच्या नाहीत. लाडावलेली कन्या तर तिच्याकडे बघून नाक मुरडायची. ते ऐकून त्यांनी मला गजम्मा बद्दल विचारलं, मी थोडं फार सांगितलं. मात्र तिच्या आई बाबांबद्दल मी काही बोलले नाही.

असेच काही महिने गेले. गजाम्माची आणि माझी खरीच छान मैत्री झाली होती. एक दिवस मी तिला म्हणाले "घरी ये ना तू. माझ्या आईला भेट. आवडेल तिला भेटायला". गजम्मा खूप खुश झाली. कुणाकडेच ती फारशी गेली नसावी. तिच्या रोजच्या चाकरीत कुठे वेळ तिला, कुणाकडे जायला! ती म्हणाली "मला आवडेल तुझ्या घरी यायला, तुझ्या आईला भेटायला"... रविवारी तिच्या ट्युशनला सुट्टी होती म्हणून तिने रविवारी यायचं ठरवलं. आईने सांगितलं होतं मला की तिला जेवायलाच येऊ दे. आम्ही तिची वाट बघत होतो. साधारण साडेबारा वाजता बेल वाजली. मी दार उघडले तर समोर गजम्माची मूर्ती उभी. धापा टाकत होती, घामाने भिजली होती, आणि तिच्या हातात एक मोठ्ठा भोपळा होता! मी आश्चर्याने तिच्याकडे बघितलं - तिने तो भोपळा पुढे केला. तो इतका जड होता की मी तो हातात घेताच माझे हात त्याच्या वजनाने खाली झाले आणि मी स्वतःला सावरलं ! कसाबसा तो भोपळा मी स्वयंपाकघरात नेऊन ठेवला. आईला पण आश्चर्यच वाटलं.

"हे काय गं?" मी तिला विचारलं. तोवर आईने तिला पाणी प्यायला दिलं होतं. ती अजून दम खात होती. पाणी पिऊन झाल्यावर नेहमीच्या तिच्या सहजपणानेच बोलली- "माझ्या घरा बाहेर आम्ही भाज्या लावल्या आहेत, पण आत्ता फक्त भोपळाच होता! म्हणून तोच आणला"! माझी तर बोलतीच बंद झाली. ही मुलगी घरापासून चालत तिच्या बसस्टॉप पर्यंत, मग बसच्या प्रवासात आणि परत आमच्या घरापर्यंत हा भोपळा झेलत आली होती! गजम्मा नावाचं सार्थक झालं असा एक खट्याळ विचार डोक्यात आला. पण आपण कधी कुणाकडे रिकाम्या हाताने जात नाही - हा शिष्टाचार तिने पाळला होता. मग ज्या मुलीला बाहेरच्या मिठाया आणि पेढे परवडत नव्हते तिने घरचा भोपळाच आणला! तिला काही त्यात गैर वाटलं नाही, उलट घरचा भोपळा दिला म्हणून तिला आनंदच झाला होता!

स्नेहबंध

मी आणि आईने तिचं खूप कौतुक केलं आणि वर मी तर तिला सांगितलं की बरं झालं तू छान भोपळा आणलास, मला घारगे खूप आवडतात! मग आई करेल तेव्हा तुला पण देईन. आणि खरंच आईने केलेले घारगे मी खास तिच्यासाठी घेऊन गेले. त्या नंतर ती तीन चारदा आमच्या घरी आली, आणि कदाचित या लोकांना भोपळा खूप आवडत असावा अश्या समजुतीमुळे प्रत्येक वेळा ती भोपळा घेऊन आली! आमच्या एक दोन नातलगांनी तिला "भोपळावाली मैत्रीण" अशी उपाधी दिली!

एकदा अशीच आमच्या घरी आली. तेव्हा मी आणि आईने नेमके बोहाऱ्याला द्यायला जुने कपडे साठवले होते. तिने आम्हाला विचारलं - हे जुने कपडे मी आमच्या गावात वाटू शकते. तिथे खूप जणांना उपयोग हाईल, तुम्हाला चालेल का मी नेले तर? तिला ते जुने कपडे द्यायला आम्ही तयार झालो, आणि ती ते मोठ्ठ कपड्यांचं गाठोडं घेऊन गेली. जी मुलगी मोठाले भोपळे नेऊ शकत होती, तिला ते गाठोडं म्हणजे फार जास्त काही वाटलं नसावं बहुतेक!
दुसऱ्या दिवशी बसमध्ये मला म्हणाली- "तुला एक सांगू? तू काही वाटून घेणार नाहीस ना"?
मी विचारलं "कशा बद्दल"?
तर म्हणाली- "तू दिलेल्या कपड्यांमधले आम्ही तीन ड्रेसेस ठेवून घेतलेत. तुला चालेल ना?
तिचा प्रश्न ऐकून मी म्हणाले- "हो, तू त्याचं काहीही कर. पण अगं ते जुने आहेत...."
त्यावर ती म्हणाली "पण छान स्टाईल आहे. माझ्या बहिणींना खूप आवडले. आणि थोडं लाजत म्हणाली – "मला पण एक आवडला". मलाच थोडं संकोचल्या सारखं झालं .
ती म्हणाली- "मी सांगितलं होतं तुम्हाला की गावात द्यायला नेते म्हणून, पण मी ठेवून घेतेय ना त्यातले तीन- असं न सांगता ठेवून घेणं बरं नाही- म्हणून तुला विचारतेय. तू जर म्हणालीस नाही, गावातच वाट तर मी ते देऊन टाकेन"

तिचा हा प्रामाणिकपणा मला अतिशय आवडला. ती साधी, सरळ, होती. ना तिला कुणाचा हेवा होता, ना स्वतःबद्दल कसलंही 'न्यूनगंड' वगैरे म्हणतात तसलं काही होतं. तिचं स्पष्टीकरण ऐकून मी हसून म्हणाले- "अगं तू त्या कपड्यांचं काहीही कर. तुला काही वाटत नसेल ते कपडे घालायला, तर घाल ना..." आणि खरंच एक दिवस स्पोर्ट्स डे ला ही नायलॉनची साडी नेसणारी मुलगी एकदम माझा जुना ड्रेस घालून अली. आणि तिने सगळ्या स्पर्धांमध्ये नुसता भागच नाही घेतला, तर सर्व पळण्यांच्या शर्यती ती जिंकली आणि "चॅम्पियन" म्हणून जाहीर झाली! आणि विशेष म्हणजे सगळ्या पळण्याच्या शर्यती ती अनवाणी पळाली होती! बाकीच्या मुलींचे अगदी 'नायकी'चे बूट होते, हातात पाण्याच्या बाटल्या... हिच्या हातात ना बाटली ना पायांत काही! जी मुलगी रोजच आयुष्यात पळत होती, तिला शर्यतीत पळायला काही वेगळं करायला लागलं नाही!

युनिव्हर्सिटीची दोन वर्षं संपत आली. सगळे अभ्यासात गुंतून गेलो होते. गजम्माचं चक्र सुरु होतं.
तिच्या कडून कधी कधी तिच्या आईची खबर कळायची. त्यांची तब्येत पाहिजे तेवढी सुधारत नव्हती. गजम्माच्या हॉस्पिटलात खूप चकरा व्हायच्या. तिच्यासाठी मी नोट्स काढून ठेवायचे. ती सगळं सांभाळून अभ्यास कधी करायची कोण जाणे! आणि ते सुद्धा कानडीतून! परीक्षा संपल्या. गजम्मा पास झाली. माझ्या आईने तिला खास जेवायला बोलावून तिला बक्षीस दिलं तेंव्हा तिच्या डोळ्यात पाणी आलं. काही मुलींची लग्न ठरली, एक दोघी पुढचं शिक्षण घ्यायला विदेशी गेल्या. आमच्या बाकीच्यांचे छोटे मोठे जॉब्स सुरु झाले. मी एका कॉलेजात लेक्चरर म्हणून लागले.

एक दिवस गजम्मा अचानक घरी अली. साधारण चारची वेळ होती. आत येत येत म्हणाली "मी इथून जात होते, म्हटलं असलीस तर बघते. बरं झाला भेटलीस"! युनिव्हर्सिटीत असताना एक दोनदा आम्ही ठरवलं होतं – ती मला तिच्या घरी नेणार होती. ते काही जमलं नाही. तिला वेळ नसायचा, आणि घरात तिच्या इतकं चाललं होतं - मी पण विकेंडला खूप बिझी असायचे. पण ती चांगली मैत्रीण होती. कधीही हक्काने घरी येऊ शकत होती!

आम्ही गप्पा मारत बसलो. आईने चहा टाकला, आणि पोहे करायला घेतले.

"काय करतेयस आता"? आईनेच तिला विचारलं.
"जॉब शोधतीये.." मग तिने पुढे सांगितलं - तिच्या लग्नासाठी एक स्थळ घेऊन तिचा मामा आला होता. पण त्या मुलाने तिच्या धाकट्या बहिणीला पसंत केलं. तर्क लावत ती म्हणाली "बरं झालं एका बहिणीचं तरी लग्न लागतंय". पुढे ती जे बोलली ते एखाद्या सिनेमाचा संवाद ऐकल्यासारखं वाटलं. "मी जर लग्न केलं असतं आणि मुलाकडच्यांनी साथ दिली नसती तर? बहिणींचं कोणी केलं असतं? आईची पण काळजी घ्यायला लागते ना"! तिच्या बोलण्यात कुठे ही कडवटपणा नव्हता, हेवा नव्हता. असूया नव्हती. आयुष्य हे एक मोठं गणित आहे, ज्याची तर्क लावून उत्तरं काढायलाच आपण सारे आहोत, अश्या थाटात ती तिच्या आयुष्यातल्या प्रत्येक घटनेकडे बघत असावी असं मला वाटलं!

माझ्या आईला उद्देशून पुढे बोलली: "पण आंटी, जॉब मिळत नाहीये- मी जिथे अप्लाय करतेय तिथे मला विचारतात, आधीची कँडिडेट दोन लाख देणार आहे या जॉब साठी - तू किती देऊ शकतेस? - हे सगळे सरकारी जॉब्स आहेत. सरकारी नोकरी कायमची असते ना, म्हणून प्रयत्न करतेय". पहिल्यांदाच मला ती खिन्न झालेली जाणवलं.
"आंटी, तुम्ही सांगा, मी कुठून आणणार पैसे? खूप इंटर्व्ह्यू दिले, पण सगळीकडे प्रॉब्लेम आहे. ट्युशनच करायची होती तर मास्टर्स डिग्री कशाला केली असं वाटतं मला" परत तिची थोडी निराशा जाणवली. आम्ही तिला थोडा धीर दिला. चहा पोहे झाले. ती निघताना आईने तिला गिफ्ट दिली. चप्पल चढवता चढवता एकदम आयडिया आल्यासारखं म्हणाली "मी आता ना सायकॉलॉजिच्याच बीएच्या कानडीत ट्युशन घेईन! महाराणी कॉलेज मध्ये आहे ना कानडी बीए"! या मुलीच्या मार्गात इतके अडथळे होते, पण तिचा आशावादीपणा कमी झाला नव्हता. आशेच्या या विचाराने परत तिच्या चेहेऱ्यावर हास्य उमटलं! तिचे डोळे परत चमकले!

मी तिला म्हटलं, "गजम्मा, तू मास्टर्सला आलीस ना हे फार छान झालं. तू आली नसतीस तर मला तू भेटली नसतीस! आणि तुला भेटून मी खूप काही शिकले"!

आम्ही परत भेटायचं ठरवलं. पण त्या दिवशी पासून आज पर्यंत तिची आणि माझी भेट झाली नाही. मी बेंगलोर सोडून पुण्याला, पुढे अमेरिकेला आले....तिच्या घरी फोन नव्हता, बाकीच्यांशी तिचा संपर्क नव्हता. आणि सगळ्या मुली कुठे कुठे विखुरल्या होत्या...आपापल्या आयुष्यात रमल्या होत्या

कधी कधी गजम्माची आठवण येते. फेसबुकवर शोधली, सापडली नाही.....कुठे असेल, काय करत असेल? तिचं लग्न झालं का? तिची आई बरी झाली का? कधी वाटतं, ती परत कधी भेटेल का?

नशिबाला सगळेच शरण जातात, पण स्वतःच्या नशीबाला, स्वतःच्या आयुष्याला, दुसऱ्यांना किंवा भगवंताला तिने कधीही कोसताना मी ऐकलं नाही. तिच्या बोलण्यात कुणाबद्दलही हेवा जाणवायचा नाही, कधीही कुणालाही नावं ठेवलेलं मी दोन वर्षांत ऐकलं नाही. एका दृष्टीने "*ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असु द्यावे समाधान*" या ब्रीदावर, परंतु स्थितप्रज्ञासारखी कार्यरत राहून आपल्या नशिबाला तोंड देणाऱ्या या गजम्माने मला खूप खूप काही शिकवलं.

सगळ्यात मोठी गोष्ट मी कळत नकळत शिकले ती म्हणजे आलेल्या क्षणाचा आनंद लुटावा.....बारीक सारीक दैनिक तक्रारींचा बाऊ करू नये....येईल त्या कष्टाला सामोरं जावं...कर्तव्य आणि कर्म करत राहावं, स्वप्नं बघावीत, पण कशात गुंतू नये. आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे कधीही आशा सोडू नये.....ही माझी काही काळची सहप्रवासी कुठल्या थांब्याला उतरली, कुठल्या गर्दीत नाहीशी झाली माहीत नाही.. पण केंव्हातरी कुठेतरी, सहजच कधीतरी, तिची परत भेट घडेल ही माझी आशा अजून कायम आहे!

- **डॉ. स्वाती संजय कर्वे**

A BOLLYWOOD DANCE SPECTACULAR
DYNAMIC MUSIC • BRILLIANT DANCERS • OPULENT COSTUMES • STUNNING VISUAL EFFECTS
"top-notch, extraordinary display of the real thing!"
- THE STAR
Mystic India
THE WORLD TOUR
shilp ENTERTAINMENT
T&D BAWA PRODUCTIONS, LLC
PARACHA ENTERTAINMENT
Perfect THREADING SPA & WELLNESS
12 MAY | 7:30 PM
REDFORD THEATER
17360 Lahser Rd, Detroit, MI 48219
TICKETS & INFO
WWW.REDFORDTHEATER.COM
SHILP ENTERTAINMENT - 248.923.1078
T&D BAWA - 313.312.5076

बंडूदादा

बाळपण सुखात जायचा एक सोप्पा आणि अक्सीर फॉर्म्युला आहे. एका टाईम मशीन मध्ये बसावं. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या पहिल्या उत्साहवर्धक दशकात पोहोचावं. नागपुरातल्या एखाद्या मोठ्या, एकत्र पद्धतीच्या, अन खूपश्या प्रेमळ बहिणी असलेल्या देशस्थ कुटुंबात जन्म घ्यावा. आणि या सगळ्या भाग्याचा नि:संकोच पणे उपभोग कसा घ्यावा, हे शिकवायला "बंडू" हे नाव सार्थ करणारा एक थोरला भाऊ असावा.

बंडूदादा म्हणजे नागपूरच्या "महाल" भागात राहणाऱ्या माझ्या शांतामावशीचा मुलगा. वयाने माझ्याहून सात-आठ वर्षांनी मोठा. त्याला चार बहिणीच असल्याने त्याच्या घरीं त्याचं मोठं प्रस्थ होतं. माझ्या वयाच्या सातव्या-आठव्या वर्षांपर्यंत मात्र माझी आणि बंडूदादाची ओळख जुजबीच होती. माझ्या थोरल्या बहिणीचा तो दोस्त होता. देव आनंद, सुनील दत्त नामक कुणा अनोळखी मंडळींबद्दल त्यांच्या गप्पा चालायच्या. मला त्यांत स्वारस्य नसायचं. शिवाय एकत्र खेळायला समवयस्क अशी भरपूर चुलत, मावस, आणि मामे-भावंडं जवळ होतीच की.

कागदोपत्री "मुकुंद" नाव असूनही प्रत्यक्षात वापरलं गेलेलं "बंडू" हे उपनाव बहुधा त्याच्या लहानपणच्या उपद्व्यापांमुळे दिलं गेलं असावं. द्वापारयुगातला मुकुंद जर देवाचा अवतार नसता, तर त्याला देखील गोकुळवासियांनी कदाचित "बंडू"च म्हटलं असतं .

मला ऐकून ठाऊक असलेलं मुकुंददादाचं पहिलं बंड हे त्याच्याच मुंजीतलं. मुंज लावणारे गुरुजी संघाच्या तालमीतले, कर्मठ आणि शिस्तप्रिय असे विद्वान होते. ब्रह्मचर्याश्रमात पदार्पण म्हणजे "लालयेत पंचवर्षाणि" ला गुंडाळून "दशवर्षांणि ताडयेत" ची सुरुवात, असा त्यांचा पक्का ग्रह होता. बटूचा विरोध लक्षात न घेता त्याचे हातपाय बांधून न्हाव्याकडून लहानग्या मुकुंदाचं डोकं त्यांनी तासून घेतलं. मोकळं होताच बटूने गुरुजींच्या श्रीमुखात भडकावली आणि मंडपातून पलायन केलं. रामदास स्वामींनी तीन-चारशें वर्षांपूर्वी अवलंबलेली रणनीती आमच्या बंडूदादाला लहानपणचीच ठाऊक असणार.

****

या घटनेमुळे शांतामावशीच्या संघनिष्ठ माहेरी जरी बंडूदादा कानफाट्या ठरला, तरी त्याच्या स्वतःच्या घरी त्याचं कौतुकच झालं असावं. आम्हा धाकट्या भावांना देखील स्वत:च्या मुंजीत डोकं तासलं जायची, किंवा मांडी/दंड कापून तिथे बेडूक भरला जायची भीती उरली नाही. हे सगळं श्रेय आम्ही मनोमन बंडूदादाला देत असू .

वडीलधाऱ्यांना कपाळाला हात लावायला भाग पडणारा बंडूदादा आम्हा धाकट्या भावंडांना मात्र आदरणीय आणि प्रिय होता. त्याच्यात सिनिऑरिटी गाजवणाऱ्या वृत्तीचा अंश देखील नव्हता. अडचणींत पडलेल्या लहानग्यांना क्षणार्धात हसरं करायला, उत्स्फूर्तपणे संकटातून सोडवायला, तो नेहेमीच तत्पर असे.

खूप लहान असताना एकदा दुपारी घरी आलो. खेळायच्या नादात बाहेर जाताना खाऊन जायचं विसरलो होतो. आता भूक कासावीस करत होती. घरी फक्त बंडूदादा होता. मलूल चेहरा बघून त्यानं भूक लागली आहे का विचारलं. शिळ्या पोळीसोबत खायला काहीच सापडलं नाही, तर "तुला एक गम्मत देतो" सांगून त्यानी चमचाभर तेलांत तिखट, मीठ आणि गरम मसाला कालवला आणि एका नव्या पक्वान्नाची ओळख करून

दिली. आजही अधून मधून ती गम्मत पुन्हा अनुभवायचा प्रयत्न करतो, पण बंडूदादा जवळ नसताना ती मजा येत नाही.

वाड्यातल्या दोन रहाट आणि चार खिराड्या असलेल्या मोठ्या आडात एकदा एक लहानगी पाय घसरून पडली. निजलेल्या बंडूदादाच्या कानांवर मुलांचा कल्लोळ पडला. धावत बाहेर येऊन त्याने कुठलाही विचार न करता आडात उडी मारली, बुडणाऱ्या मुलीला बाहेर काढलं,आणि तोवर जमलेल्या वडिलधाऱ्या मंडळींकडे तिला सुपूर्द करून मोडलेली झोप पूर्ण करायला तो पडवीत निघून गेला.

****

मी प्रायमरी शाळेत असताना एका दुपारी बंडूदादाची जवळीक कितीतरी पटीने वाढवणारा प्रसंग घडला.

घरच्या ऐसपैस वातावरणापुढे आईचं कोकणस्थ माहेर म्हणजे सांभाळून वागायची जागा होती. आजोबांची वामकुक्षी सुरु असली, की लाकडी जिन्यावरून धडाडधड करीत उतरता यायचं नाही. वेळच्या वेळी जेवावं लागायचं. दूध-साखर-पोळीचा हट्ट करता यायचा नाही. राष्ट्रीय स्वयंवसेवक संघाच्या प्रभावामुळे "शिस्त" शब्दाचा उच्चार दिवसांतून अनेक वेळा तिथे होत असायचा. शाळेत उत्तम मार्क मिळणं फार महत्वाचं असायचं.

नुकताच मॅट्रिक परिक्षेचा निकाल लागला होता. जुन्या रामदासपेठेतल्या आजोळी आईसोबत गेलो होतो. पोहोचायला जरा उशीरच झाला असावा. दिवाणखान्यात आजोबा, चार मामा, काही मावश्या गंभीर चेहरे घेऊन बसले होते. बंडूदादा समोर अपराधी चेहेरा घेऊन उभा होता. त्या लहान वयातही काय घडलं असावं, काय चाललं असावं, याची कल्पना आली आणि मी लगेच अंगणात पोबारा केला. आतली गंभीर चर्चा थोडीफार कानावर पडत होती. गणिताचं आणि बंडूदादाचं वितुष्ट मला ठाऊक होतंच. त्याच्या आधीचा, दुसऱ्या एका मावशीचा प्रभुदादा सगळ्याच विज्ञानाच्या विषयांत पारंगत होता. गणित त्याच्या हातचा मळ. नव्या पिढीतला तो पहिला इंजिनियर. नंतरच्या समस्त मुलांनी त्याचं अनुकरण करणं प्राप्त होतं. या अलिखित संकल्पाला बंडूदादाने सुरुंग लावला होता.

बऱ्याच वेळाने बंडूदादा बाहेर आला. त्याचा नेहेमीच उत्साह कुठेच दिसत नव्हता.

"तुझ्याजवळ एक आणा आहे का रे?" त्याने मला विचारलं. मला धन्य-धन्य झालं. मॅट्रिक सारख्या मोठ्या परीक्षेत नापास होणाऱ्या थोरल्या भावाला माझ्यासारख्या लहान भावंडाजवळ इतकी प्रचंड रक्कम असू शकेल असं वाटणं, ही साधी गोष्ट नव्हती.

"नाही रे बंडूदादा, पण कशाला हवा आहे तुला एक आणा?" त्याच्याइतकंच मला देखील अपराधी वाटत असावं.

"मला मोरचूद विकत घ्यायचं आहे." त्याने सांगितलं.

मला त्या पदार्थाबद्दल आणि त्याच्या गुणधर्माबद्दल माहिती होती. सुंदर दिसणाऱ्या त्या पदार्थाचा वापर गरजू लोक आत्महत्या नावाच्या आदरणीय गोष्टीसाठी करतात हे देखील ऐकून ठाऊक होतं. मॅट्रिकच्या मोठ्या परीक्षेत आणि

तेसुद्धा गणितात नापास होणं, ही कुंभीपाक नरकात जायची गोष्ट होती. कुणाही स्वाभिमानी माणसाला अशा परिस्थितीत आत्महत्येशिवाय पर्याय नाही, हे मला तात्काळ उमगलं.

"माझ्याजवळ तर एक पैसा सुद्धा नाही रे. पण घरी रंग लावताहेत. घमेलंभर मोरचूद आहे. तुला आणून देऊ ?" बंडूदादाला अशा महत्वाच्या प्रसंगी मदत करणं माझं आद्य कर्तव्य होतं.

बंडूदादाने माझ्याकडे एक अगम्य कटाक्ष फेकला, आणि एकही शब्द अधिक न बोलता तो कुठे तरी निघून गेला.

पण गणिताशी झालेल्या कुस्तीत पहिल्या राऊंड मध्ये अपयश आलं, म्हणून हार मानणारा बंडूदादाचा पिंडच नव्हता. पुन्हा दंड ठोकून त्याने हीच कुस्ती आणखीन अर्धा डझन राऊंड सुरु ठेवली. पण गणित हा विषयच मुळी आडमुठा. प्रत्येक राऊंड आमच्या नेपोलियनची वॉटर्लू ठरला. शेवटी बंडूदादाने रणांगणच बदलायचं ठरवलं. विज्ञान शाखा सोडून कला विभागात प्रवेश घेतला, मॅट्रिकची परीक्षा एकदाची पार पाडली, आणि बोर्ड-युनिव्हर्सिटीच्या नाकावर टिच्चून काही वर्षांतच चक्क Ph. D. चं बिरुद मिरवलं.

****

एक गणित सोडलं, तर बंडूदादाला अशक्य असं काहीच वाटत नसे.

त्या काळांत घरात रेडिओ असणं महत्वाचं होतं . पंतप्रधान नेहरू अधून मधून आकाशवाणीवर राष्ट्राला उद्देशून भाषण करायचे. सगळं घर त्यांचं सांगीव ऐकायला रात्रीचं जेवण आटोपून रेडिओ भोवती गोळा व्हायचं. पण शब्दांपेक्षा खरखरच अधिक ऐकू यायची. तो ट्रान्झिस्टर्सचा जमाना नव्हता. रेडिओतले व्हॉल्व्ह कधी हा तर कधी तो, असे जळून खाक व्हायचे. आता काय करायचं, हा मोठाच प्रश्न असे. रेडिओ रिपेअर करणारी दुकानं विरळा आणि बरीच दूर असावीत. अशा वेळी बंडूदादाचा धावा व्हायचा. तो देखील गंभीर चेहेऱ्यानें मागचा बोर्ड सुटा करून आत डोकावायचा; काही एक न समजणारा डायग्नोसिस सांगायचा; चार-सहा रुपये जळलेला पार्ट विकत आणायला मागायचा; आणि आठवड्याभरात रेडिओ सुधरवण्याची हमी देऊन, सायकलला रेडिओ बांधून जो अदृश्य व्हायचा तो पुन्हा दिसायला कुठलासा मुहूर्त शोधूनच परत यायचा. काळ-काम-वेगाच्या किंवा बजेटच्या चौकटीत बांधून घेण्याचं तत्व कुठल्याही वऱ्हाडी माणसाला मान्य नसायचं. मग बंडूदादा त्याला अपवाद का असावा? कधीतरी तो रेडिओ खरखर करायला पुन्हा घरी यायचा, आणि नेहरू भक्तांना दिलासा मिळायचा.

या उलट पतंग स्वहस्ते तयार करणं; पतंगांच्या सीझन मध्ये शाळा-कॉलेजला चाट मारून तासनतास पतंगांचे पेच लढवणं; कापलेल्या पतंगांचा पाठलाग करून ते जिंकून परत गच्चीवर सुखरूप आणून ठेवणं; आम्हा बाल-गोपालांना पतंगांच्या शास्त्रातल्या खुब्या समजावणं; चक्री नीट धरून पेच लढवणाऱ्याला कमी-नाही-जास्त-नाही अशी "ढील" कशी द्यावी हे शिकवणं; वगैरे चौसष्ठ कलांत तो पारंगत होता. परीक्षेच्या दिवशीसुद्धा आम्हाला सायकल शिकवायला मागचं कॅरियर धरून तासभर धावायला तो एका पायावर तयार असे.

तेव्हाचे विजेचे bulbs वरचेवर fuse व्हायचे. तुटलेलं फिलामेंट काळजीपूर्वक आतल्या-आत हलकेच जोडून दिव्यांना पुन्हा चालू करण्याची कला देखील बंडूदादानें आम्हाला शिकवली. पण असले उपद्याप मी करायला लागलो, तर आईला धास्ती वाटायची. एकदा घरातले फ्यूज झालेले

विजेचे डझनभर bulb आईने आमच्या तावडीतून सोडवून बंडूदादाला सुपूर्द केले,आणि दूर कुठेतरी नेऊन त्यांची विल्हेवाट लावायला सांगितलं. पण इतक्या उपयुक्त गोष्टी वाया घालवायचा बंडूदादाचा पिंडच नव्हता. आईची पाठ वळताच bulb फोडून, बागेतल्या दगडांवर काचेचा भुगा कसा करायचा, हे आम्हाला शिकवलं गेलं. नंतर वडिलांचं जुनं धोतर फाडून, त्या भुग्याची वस्त्रगाळ पूड कशी करावी, स्वयंपाक घरातला झाकून ठेवलेला भात पळवून, त्यात कोरफडीच्या चिकासह काचेची पूड घोटून मांज्याची "लुद्दी" कशी करावी, हे प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं. चक्रीतल्या "संकल" छाप सद्दीवर दोन लेपांचा मांजा केला गेला. पतंग नव्हता, तर नवा तयार करायचं ठरलं. ताव आणायला पैसे नव्हते, तर ताज्या "स्टेट्समन" वृत्तपत्राचं मधलं, अग्रलेखाचं डबल पान वापरलं गेलं. नीनाताईच्या डिसेक्शन बॉक्स मधला बेडूक कापायचा वस्तरा वापरून बांबूच्या लांब सळया कापून गुळगुळीत केल्या गेल्या, आणि उरल्या सुरल्या भाताचा डिंक म्हणून वापर करून एक "ढड्डा" पतंग तयार करण्यात आला. शाळेला चाट मारणं ओघाने आलंच होतं . पुढले दोनचार तास देखील मजेत गेले.

"कचऱ्यातून कला" वाक्प्रचार लोकांच्या तोंडी रुळायच्या कितीतरी आधी आम्हाला त्याची उदाहरणासह ओळख बंडूदादाने करून दिली होती.

****

बंडूदादाला वाचनासारख्या फुकाच्या गोष्टींमध्ये रस नव्हता. पण शास्त्रीय संगीताचा तो भुकेला असायचा. स्वर-साधना संगीत समाजाचा एकही कार्यक्रम त्याने चुकवला नसावा. चांगलं-चुंगलं खाण्याचा शौक असल्यामुळे स्वयंपाक करण्यातही त्याला गती होती. भरपूर वऱ्हाडी तंबाखू घालून वर चुना मारलेल्या कलकत्ता पानाचा तोबरा सदैव तोंडात असे. म्हणण्यासारखं हे त्याचं एकच व्यसन.

स्वित्झरलँडच्या केशराबद्दल त्याला कुतूहल असल्यामुळे मी एकदा त्याच्यासाठी केशराच्या आठ-दहा पुड्या तिथून घेऊन आलो होतो. त्याला खूपच आनंद झाला. "केशर घातलेलं पान खायची बऱ्याच दिवसांपासूनची इच्छा होती" सांगत त्याने एक मोठी केशराची पुडी ओतून नवा विडा बांधला आणि लगेच तोंडात कोंबला. वऱ्हाडी तंबाखू आणि कळीदार चुन्याला सरावलेलं त्याचं तोंड केशर घातल्यामुळे कसं-काय भाजलं, हें मला आजवर समजलेलं नाही!

****

उच्च शिक्षणासाठी नीनाताई अमेरिकेला गेली, अन तिच्या वाटचा बंडूदादाचा लोभ देखील माझ्या वाट्याला आला. सिनेमाविषयी गप्पा मारायला तिची जागा घ्यायला म्हणून की काय सिनेसृष्टीची नवी ओळख सुद्धा त्यानेच करून दिली.

माझी सिनेमांची तोवरची ओळख ऐतिहासिक आणि पौराणिक कथांपुरती मर्यादित होती. तशा चित्रपटांतले खलनायक किंवा खलनायिका ओळखायला अगदी सोप्या असायच्या. याउलट नायक-नायिकांसारखे सज्जन लोक दिसायला स्वच्छ आणि सुरेख असत. या सगळ्या मंडळींचं चालणं-बोलणं देखील ते विश्वासपात्र आहेत की नाहीत हे सहज समजावं, असं सुस्पष्ट असायचं. हे सगळे बाळबोध ठोकताळे बंडूदादा करवी सिने-माध्यमातून मिळालेल्या शिक्षणाने बदलले.

तलवारी धनुष्य-बाणां ऐवजी गुप्त खणात दडवलेलं पिस्तूल वापरणारा, आणि सूट बो-टाय धारण करणारा नव्याच प्रकारचा ऐटबाज खलनायक "बारह बजे" नामक चित्रपटाद्वारे बंडूदादाच्या कृपेने मला बघायला मिळाला. दोन-

तीन तासांच्या त्या बौद्धिकात "तो पहा गुरु दत्त", "ती बघ वहिदा रेहमान", "नाचते आहे ना, ती आहे हेलन", आणि "हा आपला जॉनी वॉकर" अशा रनिंग कॉमेंटरी मुळे अनेक थोरा-मोठ्यांच्या दुरून ओळखी झाल्यात. बॉल-डान्स, कॅबरे वगैरे न गेलेले शब्द त्या दिवशी प्रथम कानांवर पडले. ओ . पी. नय्यर या संगीतकाराची मोहिनी त्या अपरिपक्व वयातल्या पहिल्या भेटीत जी पडली, ती आजतागायत अबाधित आहे.

जॉनी वॉकर हा त्याचा हीरो. वेगवेगळ्या सिनेमातली जॉनी वॉकरची प्रसिद्ध वाक्य अनपेक्षित पणे संभाषणांत वापरून ऐकणाऱ्यांना गारद करायची त्याची शैली अचाट होती. जगाने आचरट, पाणचट म्हणून संभावना केलेला, पण बंडूदादाने "आपला" म्हटलेला हा गुणी नट माझा देखील हीरो होणार , हे अर्थातच अपरिहार्य होतं.

पुढे कधीतरी जॉनी वॉकरचा एक मराठी चित्रपटही बघायला मिळाला. जयश्री गडकरच्या थोरल्या भावाचं काम केलं होतं त्याने. चित्रपटातल्या या पात्राचं नाव देखील कर्म-धर्म संयोगाने बंडूच निघालं !

जॉनी वॉकरच्या चित्रपटांची एक खासियत असायची. त्याचा कुठलाही सिनेमा घ्या, त्याने रंगवलेली पात्रं कठीण परिस्थितीला कधीही हार जायची नाहीत. चित्रपटातल्या दारुण प्रसंगांना विदूषकी क्लृप्त्या योजून तो नेहेमी आत्मविश्वासाने सामोरं जायचा आणि परिस्थितीतलं जहरच मवाळ करून टाकायचा. त्याच्यातलं अन बंडूदादातलं हे साम्य खूप नंतर लक्षात आलं.

****

१९७३ सालच्या सुरुवातीला, म्हणजे बहुधा जानेवारी-फेब्रुवारी-मार्च मध्ये कधीतरी, बंडूदादाचं Inland Letter दादरला, मुंबईत मिळालं. त्या वेळी मी हरिभाऊ-कृष्णाबाई मोटे यांच्या कृपा-छत्राखाली त्यांच्या घरी रहात असे. टाटा मधल्या चाकरीला वर्ष देखील झालं नव्हतं. घरची आठवण सततच असायची, त्यामुळे आवडत्या थोरल्या भावाचं पत्र बघून खूप आनंद झाला.

आतली बातमी तर अधिकच खास होती. आज देखील सुवाच्य अक्षरात लिहिलेलं ते प्रेमाग्रहाचं बोलावणं आठवतं - प्रसंगानुसार किंचितसं औपचारिक, पण बंडूदादाच्या नेहेमीच्या उत्साही आणि आनंदाच्या स्वभावाची साक्ष देणारं. "येत्या मे महिन्यात माझा विवाह वर्ध्याच्या कु. XXX घैसास यांच्याशी ठरला आहे. या मंगल प्रसंगी तुझं हजर असणं आवश्यक आहे. रीतसर पत्रिका येईलच..." वगैरे. पुढे पत्रिका बघितल्यावर कळलं, वहिनींचं माहेरचं नांव वेगळंच कांहीतरी होतं. पण नांवात काय आहे? नाहीतरी आपण ते बदलतोच!

यथावकाश अस्मादिकांची स्वारी लग्नाच्या आदल्या दिवशीच्या पहाटे-पहाटे वर्ध्याच्या Railway Station वर उतरली. सकाळ जितकी सुंदर होती, तितकीच दुपार उन्हाळ्यानीं प्रचंड तापलेली. पण बंडूदादा, त्याच्या मित्र-वर्गाचं आणिआम्हा भावंडांचं प्रचंड वर्तुळ - आम्हा नागपूरकरांना वऱ्हाडच्या उन्हाळ्याचं काय कौतुक? चेष्टा-मस्करी, हसणं-खिदळणं, सगळ्याला अगदी ऊत आला होता. बंडूदादा खुषीत होता. सीमांतपूजनाच्या फॉर्मल प्रसंगी, भर मंडपात, आजवर एक-दोन वेळीच प्रत्यक्ष भेटलेल्या सहधर्मचारिणीशी काहीतरी धाडस करून जवळीक साधायचा बेत त्याच्या आतल्या वर्तुळात त्याने जाहीरही करून टाकला. संध्याकाळचं सीमांत-पूजन थाटात झालं. "ती पूजेला आल्या-आल्या मस्तपैकी डोळा मारला मी!" नंतर बंडूदादाने रिपोर्ट दिला.

दुसऱ्या दिवशीचं लग्न. एवढ्या उकाडयात देखील Double Breasted suit घालून नवरदेव एका प्रचंड घोड्यावर बसून लग्न-मंडपी पोहोचले. होणाऱ्या सासूबाई पंचारती हातात घेऊन दारात उभ्या होत्या. नवरदेव

स्नेहबंध

मोतद्दाराला न जुमानता उलट्या बाजूनेच उतरत आहेत, असं दिसल्यामुळे जमलेली मंडळी जरा घोटाळ्यात पडली. पण लगेच त्या प्रश्नाचं उत्तर देखील मिळालं. पलीकडे एक पिंक टाकून नवरदेव पंचारतीला रीतसर सादर झाले.

स्वत: संसारात पडल्यावर प्रेमाच्या आप्त-स्वकीयांना गृहस्थाश्रमात बंदिस्त करून पुण्य संपादन करायची प्रबळ इच्छा युनिव्हर्सल असते. बंडूदादा तिला अपवाद नव्हता. पुढे काही वर्षांनी एकटं गाठून लग्न करायची इच्छा आहे का, असं विचारलं.

"त्या अमुक-तमुकाची मुलगी चांगली टणाट्टण आहे". कुठल्याश्या स्थळाची शिफारस सुद्धा त्याने आपल्या पद्धतीने करून टाकली !

****

माझ्या परदेशी भ्रमंतीमुळे आणि नंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यावर नागपूरच्या भेटी हळु-हळू कमी होत गेल्या, पण प्रत्येक वेळी कोठी-रोड वर एक चक्कर आवर्जून असायची. १९९८ साली आम्ही तिघे तिकडे गेलो असताना, दृष्टी अधू झाली असून देखील बंडूदादाने आम्हाला उत्साहाने ताजे बटाटे-वडे स्वहस्ते करून खायला घातले होते.

गरमागरम चहाचा कप प्रेमाने हातात देत कुठल्याशा चहाच्या जाहिरातीतली पंच लाईन तो नेहेमीच्या उत्स्फूर्तपणे त्याच कमर्शियलच्या थाटात बोलून गेला,

"प्रत्येक घोट, अल्हाद-दायक!"

- **सिद्धार्थ शास्त्री**

Pillars of Strength and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG
LISTED
NYSE
HERITAGE
Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

समृद्ध चैतन्य

समृद्ध आणि चैतन्य. दोघांचाही जन्म ७ मार्च, १९८९ साली झाला. तोही एकाच वेळी. त्यांची जन्मवेळ सकाळी ११ वाजून, ८ मिनिटं आणि ३३ सेकंदाची! खरंतर दोघांचा तसा काहीच संबंध नाही. समृद्धचा जन्म पुण्याचा, तर चैतन्याचा रत्नागिरी जिल्ह्यातल्या लाटघरचा. दोघात फक्त एकच काय ते साम्य होतं. एकाच क्षणी जन्म झाल्याने, त्यांनी आत्तापर्यंत सारखेच श्वास घेतले होते.

आज रविवार, दि. ७ मार्च, २०१८. दोघांचाही आज २९ वा वाढदिवस.

समृद्ध देशमुख. गोरा,उंचापुरा, देखणा. पोट थोडंसं सुटलेलं. लकाकणारे तपकिरी डोळे आणि त्यावर Professional look देणारा चौकोनी काचांचा चष्मा. समृद्ध एका Investment firm मधे Financial Analyst. अतिशय तल्लख बुद्धीची देणगी लाभलेला समृद्ध सध्या कॅलिफोर्निया, USA मधे स्थायिक झालेला. गेल्याच वर्षी त्याने स्वतःचं असं घर विकत घेतलं होतं. बुद्धीच्या जोरावर शेअर मार्केटमधून त्याने बराच पैसा कमावला होता.

सकाळी जाग आली. त्याने घड्याळात पाहिलं.१०:४१ झाले होते. काल रात्री 'Birthday Celebration'साठी मित्रांबरोबर पबमधे गेला होता. तिथे घेतलेल्या scotch चा hangover अजून होता. डोकं थोडं दुखत होतं. त्याने त्याच्या Apple Macवर शेअर मार्केट check केलं. त्याला $४२४५ चा फायदा झाला होता. त्याच्या चेहेऱ्यावर हास्याची बारीकशी लकेर उमटली आणि लगेच मिटूनही गेली. त्याने त्याचा i-phone check केला. आईचे २ missed calls होते. 'Happy Birthday' wish करायला असतील, असा विचार करून, आवरून झाल्यावर घरी फोन करायचा असं त्याने ठरवलं.

समृद्ध एवढ्या मोठ्या घरी एकटाच राहत होता. २ वर्षांपूर्वी त्याचं लग्न झालं होतं. त्याची बायको, मीना जर्मनीत PhD करत होती. हे तिचं शेवटचं वर्ष होतं. कालच संध्याकाळी त्यांचं एका छोट्याश्या कारणावरून मोठ्ठं भांडण झालं होतं. त्याला काही मीनाला फोन करावासा वाटत नव्हता आणि तिचाही आला नव्हता. भुकेमुळे पोटात गरम वाटून ते दुखू लागल्याने तो आवरायला म्हणून उठला. खोलीत बराच पसारा झाल्याचं त्याच्या लक्षात आलं आणि आता लवकरच तो आवरला पाहिजे असं त्याने ठरवलं. त्याने कधी नव्हे ती आज त्याच्या पांघरुणाची घडी घातली. तोंड धुतलं आणि नाश्ता तयार करायला सुरुवात केली.

त्याने केलेला चहा कपात ओतताना थोडा बाहेर सांडला. त्याला आईची आठवण आली. सँडविचेस तयार करताना त्याला मीना आठवत होती. सगळ्या बाजूंनी सारखा आणि काहीसा खरपूस असा मीना भाजते तसा ब्रेड त्याला नाही भाजता आला. सँडविचेस आणि चहा घेऊन तो सोफ्यावर येऊन बसला. त्याने त्याचा 65 inches, 4K Ultra HD TV सुरु केला आणि Basketball match बघत खाऊ लागला.

खाऊन झाल्यावर घरी फोन करू म्हणून त्याने फोन घेतला, पण डोकं अजूनही थोडं बधीर होतं. छान गरम पाण्याने आंघोळ करून, fresh होऊन मग घरी फोन करूयात असं त्याने ठरवलं.

स्नेहबंध

आज रविवार असल्याने कसलीच घाई नव्हती. त्याने टब बाथ घ्यायचं ठरवलं. पाणी तयार केलं. सगळे कपडे उतरवले आणि त्या टबात स्वतःला झोकून दिलं. त्या गरम साबणाच्या पाण्यात त्याला खूप बरं वाटलं. अंगावर काही नसल्याने छान हलकं वाटत असावं असा विचार त्याच्या मनात आला. मग अंगावर उरलेली शेवटची वस्तू, त्याच्या बोटातली अंगठी त्याला जास्तच जड वाटू लागली. त्याने तीही मग बाजूला काढून ठेवली.

आता त्याला खरंच fresh वाटत होतं. मेंदूची बधिरता हळूहळू उतरत होती. ते गरम पाणी त्याच्या body cells charge करत होतं. त्याची विचारचक्रं सुरु झाली. 'आज आपला वाढदिवस आहे. आज खूप special दिवस आहे.' असा त्याने विचार केला आणि तो त्याच्या आत्तापर्यंतच्या आयुष्याचा विचार करू लागला. त्याला आधी त्याच्या सगळ्या achievements आठवल्या. १० वी, १२ वीतलं घवघवीत यश, एका प्रतिष्ठित Engineering College मधे मिळालेली admission, राष्ट्रस्तरीय Project competition मधला प्रथम क्रमांक, MBA entrance मधे पहिल्याच प्रयत्नात मिळालेलं अचंबित करणारं यश..MBA Finance आणि आता गलेलठ्ठ पगाराची नोकरी..त्याने विचार केला, 'याला म्हणतात 'कमावणं'!.. असंच लढत राहिलं पाहिजे..' मग त्याने आयुष्यातल्या अपयशांचा विचार करणं सुरु केलं. त्याला काही सुचलंच नाही. फक्त खूप वेळा ठरवून आपण नियमितपणे व्यायाम करू शकलो नाहीये आणि gym ची फी वाया घालवलीय याची थोडीशी खंत वाटली, एवढंच. पण 'ही काही मोठी गोष्ट नाहीये. लवकरच पुन्हा सुरु करू' असा विचार त्याने केला. आणि gym ची वाया गेलेली फी तर त्याच्यासाठी मुळीच मोठी गोष्ट नव्हती. हे सोडून बाकी काही अपयश त्याला आठवलं नाही. मग असेच मनात random विचार आणि आठवणी येऊन गेल्या... १०वीत बोर्डात आल्यामुळे बक्षीस म्हणून मिळालेला त्याचा पहिला computer आठवला. आणि त्यावर मग सुट्टीभर दिवस-रात्र कसे गेम्स खेळत बसायचो..हे आठवलं.. Engineeringमधे मित्रांबरोबर प्यायलेली पहिली beer आठवली. ऑफिसमधून घरी येताना तो नेहेमी त्याच्या ipod वर गाणी ऐकत येतो. त्यातल्या एका गाण्याची tune त्याच्या डोक्यात वाजू लागली. Facebook मधल्या त्याच्या 'Childhood' नावाच्या अल्बम मधला एक फोटो त्याला आठवला..या सगळ्या विचारांचे अर्थ त्याला कळत नव्हते. मग त्याला emails check करायची इच्छा झाली म्हणून तो टब मधून उठला.

त्याला एक 'New Mail' दिसला. त्याचं Payment direct deposit झाल्याची ती receipt होती. सवयीप्रमाणे त्याने तो 'Payments' folder मधे transfer केला. त्याचं घड्याळाकडे लक्ष गेलं. दुपारचे २ वाजले होते. आई आता झोपली असेल हे त्याला जाणवलं. तिला फोन करायचा राहून गेला होता. त्याच्या उजव्या पापणीच्या कठड्यावरून एक पाण्याचा थेंब हलकेच खाली घरंगळला. त्याने खिशातून रुमाल काढला. त्या चुरगळलेल्या रुमालाने त्याने तो गालावर आलेला थेंब पटकन पुसला...

चैतन्य खोत. कुरळ्या केसांचा, गव्हाळ रंगाचा, मध्यम उंचीचा आणि पिळदार शरीरयष्टीचा हा एका कोळ्याचा मुलगा. त्याने रत्नागिरीत B.com केलं आणि आता मासेमारीच्या व्यवसायात आहे. याचे वडील जरी कोळी असले तरी याने स्वतःच्या हिंमतीवर बँकेतून कर्ज काढून एक छोटीशी बोट विकत घेतली आणि मासेमारीचा व्यवसाय सुरु केला. कोळ्यांना त्या बोटीतून मासेमारी करायला पाठवायचं आणि आलेले मासे मार्केटमध्ये विकायचे हा त्याचा धंदा. आज त्याच्याकडे स्वतःच्या ३ बोटी आहेत. हा लाटघर मधेच स्थायिक आहे. छान कौलारू घर, मागे नारळ-

स्नेहबंध

पोफळीची बाग, ३ काजूची आणि २ आंब्याची झाडं आणि घरासमोर अंगणात एक मोठ्ठं जांभळाचं झाड. चैतन्यचं लग्न काहीसं लवकर, म्हणजे तो २४ वर्षांचा असतानाच झालं..

आज दि. ७ मार्च, २०१८ रोजी ह्याचाही वाढदिवस. सकाळी ५ वाजता उठून चैतन्य आणि त्याची बायको सुलेखा, टेकडीवरच्या देवळात जायला निघाले. सकाळच्या त्या प्रसन्न वातावरणात सूर्य नुकताच त्याला 'Happy Birthday' wish करायला आला होता! सर्वत्र केशरी-पिवळ्या कोवळ्या किरणांची उधळण चालू होती. त्यातली काही किरणं चैतन्यच्या डोळ्यांचे चटाचट मुके घेत होती. टेकडीच्या माथ्याशी असलेल्या देवळात कीर्तन चालू असल्याने टाळ, मृदुंग, चिपळ्यांचे हळुवार, काहीसे अस्पष्ट आवाज ऐकू येत होते. दूरवरून येणाऱ्या मधुर बासरीचे स्वर त्यात मिसळले होते. पक्ष्यांची किलबिल सुरु होती. कळसावर फडकणारा तो भगवा, चैतन्यला खुणावत होता. त्या दोघांच्या चालीला गती देत होता. जसजसे ते माथ्याजवळ जायला लागले तसे ते टाळ मृदुंगाचे आवाज स्पष्ट ऐकू येऊ लागले. आजूबाजूला निलगिरींचा वास दरवळत होता. देवळात चैतन्यने एकदा खणखणीत घंटा वाजवली आणि गणपतीसमोर साष्टांग घातला. चैतन्यचं कपाळ त्या गार फरशीला टेकलं आणि त्याच्या आजूबाजूची प्रसन्नता दुप्पटीने वाढली..



खरंतर समुद्रकिनारी राहणाऱ्या लोकांना समुद्राचं अप्रूप नसतं.पण आज चैतन्यला समुद्रात भिजावंसं वाटलं. सुलेखाला पुढे पाठवून तो समुद्रात गेला. काही वेळ मनसोक्त पोहून झाल्यावर त्याने मग डुंबायला सुरुवात केली. येणारी प्रत्येक लाट तो पाठीवर घेऊ लागला. जणू ती प्रत्येक लाट त्याच्या पाठीवर शाब्बासकीची थापच देत होती! सूर्य आता थोडा वर आला होता. काहीशा प्रखर पण तरीही खूपशा कोमल अशा सूर्याकडे त्याने पहिले आणि नंतर डोळे मिटून पाण्यावर तरंगायला लागला. हे सगळं चालू असताना त्याच्या मनात ना कुठला विचार होता, ना कुठली आठवण होती, ना कुठली चिंता होती..
तो फक्त आनंदित होता. स्वतःवर आणि सभोवतालच्या प्रत्येक गोष्टीवर. २ तास मनसोक्त डुंबून झाल्यावर तो घराकडे जायला निघाला.

घरी त्याच्या आवडीचं कोलंबीचं कालवण, पापलेट फ्राय, दशमी आणि सोलकढी असा बेत होता. घरी जाताना त्याने मार्केटमधून Payment collect केलं. ते होतं समृद्धच्या biweekly paycheck च्या फक्त एक दशांश..

घरी आल्यावर आजीने त्याला ओवाळलं. मग काकीने, मग सुलेखाने आणि मग आईने. आईने जेव्हा त्याच्या कपाळाच्या मधोमध मोठ्ठं उभं गंध लावलं तेव्हा त्याचे डोळे मिटले गेले. त्याला जणू गणपतीला पुन्हा साष्टांग घातल्यासारखं वाटलं. त्याने डोळे उघडले. आईच्या डोळ्यातला अभिमान आणि ओसंडून वाहणारं कौतुक बघून त्याच्या उजव्या डोळ्यातून एका पाण्याच्या थेंबाने पटकन गालावर उडी मारली! कोणाच्या हे लक्षात येऊ नये म्हणून त्याने खिशातून रुमाल काढला आणि त्या पांढऱ्याशुभ्र, कडक इस्त्रीच्या रुमालाने भरकन ते पाणी पुसलं..

त्या दोघांच्यात फक्त एकच काय ते साम्य होतं. त्यांनी आत्तापर्यंत सारखेच श्वास घेतले होते..

- **सुशांत खोपकर**

गुणी!

कधी कधी कुणीतरी येतं तुमच्या आयुष्यात..फक्त तुमच्यावर निर्व्याज प्रेम करण्यासाठीच! माझ्यासाठी असं कुणीतरी आलं आपल्या चार पायांनी दुडूदुडू पळत... शेपूट हलवत! तर मी मांडते आहे व्यक्तिचित्र व्यक्ती नसलेल्या एका व्यक्तिमत्वाचं...

गोष्ट सुरु होते मला वालचंद ला admission मिळाली तिथून. Government कॉलेजला admission, सांगलीतल्या सांगलीत college एवढे मुद्दे बास होते आमचं सगळ घरदार खूष व्हायला! कॉलेज सुरु झालं आणि आठवडाभरात आईने विचारलं, "अप्पु काय बक्षीस हवय गं तुला?" मी लगेच म्हणाले "कुत्र घेऊ दे ना मला एक!"

आता पुढचं जे संभाषण होतं ते आमच्या घरी अनादिकाळापासून चालत आलेलं! अर्थातच, आईने लगेच नाही मान्य केलं. आपल्याला कुत्र्याची गरज नाही (गरज कशी नाही? आपण बंगल्यात राहतो, मी कधी कधी घरी एकटी असते आणि मुळात गरज नाही, फक्त माझी आवड म्हणून नाही का आणू शकत आपण?!), ती एक जबाबदारी आहे (मी घेते), आत्ता म्हणतीयेस हो आणि नंतर त्याचं काही करणार नाहीस (मनातून थोडं मान्य; पण उत्तर होतं 'तू मला आणूच नाही दिलंस कधी कळणार तरी कसं मी काही करते का नाही ते!') अश्या सगळ्या माहोलात बाबा मनापासून माझ्या बाजूने होते हे मला माहिती होतं आणि दादा घरी नव्हता त्यामुळे आई एकटी पडलेली. शिवाय आपली पोरगी बक्षीस म्हणून मागतीय तर देऊया असं वाटलं बहुतेक माझ्या माउलीला!

आणि finally मला ते तीन गोड शब्द ऐकायला मिळाले: आई म्हणाली ' बरं बाई! आण!' हिंदी serial ची डिरेक्टर असते तर या dilogue ला मी तीनदा repeat केल असतं! दुपारी बाबांनी हळूच सुचवलं, "आजच आणूया जमलं तर?" विचार पटला मला आणि आम्ही दोघे बाहेर पडलोही. थोडी शोध मोहीम आधीपासूनच सुरु ठेवल्यामुळे संध्याकाळी मी, बाबा आणि आमचं नवीन लॅब्रॅडॉर पिल्लू घरी पोहोचलो!

इतका गोंडस जीव. छोटूसं बाळ माझं. पिल्लू घराबाहेर ठेवायचं हा नियम बरोबर नाही हे मी घरी पोहोचायच्या आधीच ठरवलं. मग गच्चीवर ठेऊया रात्री यासाठीही माझं मन तयार होईना. तिची आईपासून लांब अशी पहिलीच वेळ असणार. घाबरून जाईल नं ती. मग तिला आईची आठवण येणार नाही अशी आमच्या घरात फक्त एकच जागा होती - माझी खोली!

ती माझ्या बरोबर कॉटवर झोपणार नाही यावर आई आणि बाबा पण ठाम होते. पण मी खाली गादी घातली आणि गादीच्या शेजारी ती झोपली तर? तेव्हापासून कायमच माझ्या खोलीत माझ्या गादीशेजारी किंवा माझ्या बेडखाली तिला ध्रुव ताऱ्यासारखं अढळ स्थान होतं. तिच्या या जागेमुळे सकाळी उठलं की तिच्या अंदाजाने फूटभर पुढे पाऊल ठेवायची सवय लागलेली मलाही. पुढे job साठी मुंबईला गेल्यावर 'गुणी' नव्हती बरोबर पण सवय मात्र नव्हती गेली !

एक दोन दिवस झाले तरी माझं तिच्या नावाबद्दल काही ठरत नव्हतं .. finally बाबांनी नाव ठेवलं … 'गुणी'…! मी शाळेत असताना आमच्याकडे German shepherd होती आणि तिचं नाव होतं 'गुणी' … म्हणून बहुतेक दुसरं कुठलं नाव आवडतच नव्हतं आम्हाला. ठरलं final… 'गुणी'!

स्नेहबंध



गुणी खूप हुशार होती. तिला दोन तीन दिवसांतच नाव कळलेलं स्वतःचं. त्यानंतरचा आठवडा 'गुणी' म्हटलं की ती कशी आपल्याकड बघते याचं प्रात्यक्षिक करण्यात आणि दाखवण्यात गेला आमचा. "गुणी खरच किती गुणी आहे!" हा एक stapled dilogue झाला पुढे आमच्या घरी. आम्ही बहुतेक तिला 'shake hand' वगैरे गोष्टी शिकवायला विसरलो तेव्हा. गुणीचं शिक्षण शुद्ध मराठी माध्यमातून झालं! आम्ही सगळेच (बाबा थोडे जास्तीच!) तिच्याशी ती एक मूक पाळीव प्राणी आहे हे विसरून बोलत राहायचो. बाबांच्या 'चष्मा कुठ सापडेना गुणे, बघितलायस का?' इथून पासून माझ्या 'गुणू, power electronics सुटेल ना ग?' पर्यंत सगळ्या प्रश्नांना गुणी सामर्थ्यानं सामोरी गेली. या सगळ्या गप्पांमुळे असेल पण गुणा खूप गोष्टी शिकली. भाषा समृद्ध होती तिची! command कमी शिकली (आम्ही कमी शिकवल्या!), पण आख्खी वाक्यं समजायची तिला मस्त.

दात शिवशिवतात त्या phase मध्ये गुणी फक्त कार्यानुभवाचा तास चालू ठेवायची घरी. कागदाचे किती छोटे छोटे तुकडे केले जाऊ शकतात, कचरा वेळेत घराबाहेर नेला नाही तर घरभर कसा पसरला जाऊ शकतो, बूट किती चावला की त्यातून आरपार दिसायला लागतं हे सगळं करून बघितलं तिने. आम्ही कुणी चिडून 'कुणी केलं हे सगळं?' म्हटलं की मात्र चेहरा पाडून maximum बिच्चारे expressions देत खाली बघत बसायची. विषय बदलेपर्यंत वरसुद्धा नाही बघणार मग तेव्हा.

थोडी मोठ्ठी झाल्यावर ती गाडीवर बसायला शिकली आणि प्रचंड आवडायचं तिला गाडीवरून फेरी मारायला. हुशार तर एवढी की कधी घेऊन जाऊ शकतात आणि कधी नाही हे पण पक्क माहिती होतं तिला. आईच्या आणि माझ्या कॉलेजला जायच्या वेळेत अजिबात हट्ट नाही करणार. पण अश्या ठराविक वेळा सोडल्या तर घरातलं कुणीही बाहेर निघालं आणि हातात गाडीची किल्ली दिसली की तिचं त्या माणसावरचं प्रेम उतू जायचं . घेऊन नाही गेलं तर परत येईपर्यंत आपल्यालाच guilty वाटत राहील! पण बसायची मस्त गाडीवर. पायातल्या जागेत अलगद पण निवांत बसून फक्त तोंड बाहेर काढून heroine सगळीकडे निरखत बसायची. कधी कधी तर वाटायचं आपण driver आहोत हिचे. Truck किंवा मोठ्ठी गाडी आली शेजारून की मात्र लगेच मान आत घ्यायची. घाबरट! कधी कधी मग पळायचा मूड यायचा तिला. जास्ती स्पीडमध्ये कधीच नाही उडी मारायची खाली, speed breaker ला गाडी हळू झाली की टुणकन उडी मारेल आणि मग पळत येईल बरोबर.

पाहुणे आले कुणी आणि जर घाबरत असतील कुत्र्याला तर मग तिला गच्चीवर पाठवावं लागायचं. आधी माझ्या खोलीत जाण्याचा option ट्राय करायची, नाहीच म्हटलं तर मग जायची वर finally. पण मग अश्या वेळी बाहेरचं माणूस जाण्याकडे खूप लक्ष असायचं तिचं. ते गेले की हिचा मागच्या दारात दंगा सुरूच "आत घ्या मला .. गेले ते!" लहान मुलांबद्दल मात्र थोडं उलट. ती कधीच कुणा लहान मुलावर गुरगुरली नाही, परिणामी सगळ्या टिल्यांना पण चांगलं खेळणं वाटायची ती. मग तिची शेपूट ओढ, तिचा घोडा बनव असलं सगळं सुरु व्हायला वेळ लागायचा नाही. तिचं ती पण ओळखून होती बहुतेक. कुणीही लहान मूल घरी आलं, की गुणी आपोआप मागच्या दाराजवळ जाऊन उभी रहायची! दार उघडलं की धुम्म पळून जायची गच्चीवर.

सगळ्यांच्या गप्पा ऐकण्यात प्रचंड इंटरेस्ट होता तिला. प्रत्येक खोलीत आपली आपली जागा बनवून ठेवलेली तिनं. बाबा कधीही म्हणाले, “गुणे, जागेवर जा तुझ्या” की ही त्याच खोलीतल्या तिच्या स्वघोषित जागेवर जायची! त्यापुढे जर म्हणाले, "इथे नाही. तुझ्या खऱ्या जागेला" तरच मग दाराजवळ जाऊन बसेल.

स्नेहबंध

लहानपणीचे दिवस सोडले तर खूप कमी संहारक कृत्य केली गुणूने! गादीवर किंवा hall मधल्या गालिच्यावर पाय द्यायचा नाही हे पण madam ओळखून होत्या. गालिच्याची जागा बदलली आणि तिला यायला जागा राहिली नाही की घुटमळत रहायची. थोडी जागा करून दिली की त्यातून वाट काढून येणार. एकदम नजकातसे !

बाबा तिच्या ट्रेनिंग बद्दल आणि तिच्या गुणीपणावर खूप खुश असायचे कायमच. अपवाद एकच... तिचे 'ते' दिवस ... मग तेव्हा आमची heroine चोरून पळून जायची तिच्या प्रियकरांबरोबर! मग बाबांची फुल चिडचिड. तिच्यावर आणि आमच्यावर पण! परत यायच्या बाईसाहेब तेव्हा बाबा तिची शाळा घ्यायचे. " अस जातात का पळून? लाज आहे का जीवाला तुझ्या?. मी देतो की तूला बघून चांगला" वगैरे सुरु व्हायचं बाबांचं. गैरसमज नकोत म्हणून एक दोनदा मी बाहेर जाऊन बसलेलं आठवत मला!

बाकी दादा आणि आईचा कुत्रं घरी आणायला मूळचा विरोध असला तरी, गुणीची जास्त काळजी त्यांनीच घेतली. तिच्या पाण्याच्या कुंड्यात कायम पाणी पाहिजे असा दादाचा सक्त आदेश होता. तिला फिरायला घेऊन जाण्यातही दादाच जास्त वक्तशीर होता. आमच्या एका स्वयंपाकाच्या काकूंच्या पोळ्यांवर गुणीने जाहीर बहिष्कार टाकलेला. वास्तविक चांगल्या पोळ्या करायच्या त्या पण गुणीला नाहीच आवडल्या त्या. त्यांच्या पोळीत थोडा जरी काळा तुकडा दिसला तर बाहेर काढून ठेवायची गुणी तिच्या कुंड्यातून! त्यांनी वैतागून काम सोडणं पुरेसं त्रासदायक झालं होतं माझ्या आईसाठी!

कुणी काही खात असेल तर त्याच्या घासाकडे बघायचं नाही हे एक बाबांनी तिला दिलेलं खास training. चुकून बघत बसलीच तर बाबा फक्त म्हणणार "कुठे बघायचं ?" madam लगेच खाली मान घालतील किंवा दुसरीकडेच कुठेतरी बघतील.

म्हातारी झाली तशी तब्येतीला जपून राहायला लागली गुणा. थंडीच्या दिवसात अंथरूण घालून दे वाले expressions द्यायची आणि अंगावर घातलेली तिची छोटू गोधडी सकाळी उठेपर्यंत नीट जपायची!

प्रत्येक किस्सा सांगण्याजोगा आहे तिचा. किती सांगू!

पुढे जेव्हा खूप आजारी पडली आणि डॉक्टरनी सांगितलं, नाही काही इलाज आता याला तेव्हाही मी भारतात जाईपर्यंत तग धरलेला तिने.

गुणी नाहीये आता. गच्चीच्या छोट्याश्या खिडकीतून आमची वाट बघत बसणारी गुणी, आमच्यातलं कुणी घरी येताना दिसलं की फुल स्पीडने गच्चीवरून खाली पळत नाही येणार आता, आलं की उडी मारणार नाही अंगावर, किती miss करते मी तिला!!! २४ डिसेंबर २०१५ ला गुणू गेली आम्हाला सोडून. तेव्हापासून ठरवत होते तिच्याबद्दल लिहायचं. हा त्यातलाच एक प्रयत्न!

- **अपूर्वा भिडे**

स्नेहबंध

ज्यांच्यामुळे मला अमेरिकेच्या भूमीवर शिवकाव्य गायला मिळाले त्या कँटनच्या महाराष्ट्र मित्रमंडळाला व त्यांनी येथे सुरु केलेल्या मराठी शाळेला

विनम्र अभिवादन


ज्यांच्यामुळे मला अमेरिकेच्या भूमीवर शिवकाव्य गायला मिळाले त्या कँटनच्या महाराष्ट्र मित्र मंडळाला व त्यांनी येथे सुरु केलेल्या मराठी शाळेला

विनम्र अभिवादन

मनापासून अभिनंदन करतो मी
महाराष्ट्र मित्र मंडळाच्या सर्वकार्यकर्त्यांचं
सातासमुद्रापार अमेरिकेत चालू केलंय त्यांनी
महान कार्य माय मराठीच्या समृद्धीचं, संवर्धनाचं
आदरणीय अजयजी, मिलिंदजी, राजीवजी
झटतायत त्यासाठी कितीतरी वर्ष
माय मराठीवरचं त्यांचं प्रेम पाहून
होतोय खूप खूप हर्ष
राधिकाताई, दीपाताई, क्रांतीताई, भावनाताई
वाखाणण्याजोगी आहे सर्वांची तळमळ
खूप आनंद झाला पाहून, अमेरिकेच्या भूमीत
फुललेलं माय मराठीचं कमळ
महाराष्ट्र संस्कृतीचं दिव्य दर्शन घडलं
अमेरिकेतल्या शिवजयंतीला
खूप खूप धन्यवाद देतो या सेवाभावी टीमला
व या शाळेत मुलांना पाठवणाऱ्या सर्व पालकवर्गाला
प्रसन्न सरांच्या शिवरायांच्या गोष्टी ऐकून
अगदी प्रसन्न झालं मन
महाराष्ट्राच्या या अमृतपुत्रांनी अर्पण केलंय
आपल्या मायबोलीसाठी तन, मन, धन
त्यांच्या अभिनंदनार्थ अर्पण करतो त्यांना हे काव्यसुमन
आयुषचे आजोबा - श्री. राजेंद्र वाणी - 9321951447 (mob.)

मनापासून अभिनंदन करतो मी
महाराष्ट्र मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांचं
सातासमुद्रापार अमेरिकेत चालू केलंय त्यांनी
महान कार्य माय मराठीच्या समृद्धीचं, संवर्धनाचं

आदरणीय अजयजी, मिलिंदजी, राजीवजी
झटतायत त्यासाठी कितीतरी वर्ष
माय मराठीवरचं त्यांचं प्रेम पाहून
होतोय खूप खूप हर्ष

राधिकाताई, दीपाताई, क्रांतीताई, भावनाताई
वाखाणण्याजोगी आहे सर्वांची तळमळ
खूप आनंद झाला पाहून, अमेरिकेच्या भूमीत
फुललेलं माय मराठीचं कमळ

महाराष्ट्र संस्कृतीचं दिव्य दर्शन घडलं
अमेरिकेतल्या शिवजयंतीला
खूप खूप धन्यवाद देतो या सेवाभावी सर्व टीमला
व या शाळेत मुलांना पाठवणाऱ्या सर्व पालकवर्गाला

प्रसन्न सरांच्या शिवरायांच्या गोष्टी ऐकून
अगदी प्रसन्न झालं मन
महाराष्ट्राच्या या अमृतपुत्रांनी अर्पण केलंय
आपल्या मायबोलीसाठी तन, मन, धन
त्यांच्या अभिनंदनार्थ अर्पण करतो त्यांना हे काव्यसुमन

- (आयुषचे आजोबा) श्री. राजेंद्र वाणी

LIFE CHANGES.

And when it does, we can help your financial life change with it.

Contact me today at 248-688-3694 to arrange your no-obligation consultation. This discussion can help you capture a clear understanding of your current financial life, and reveal strategies for a strong future.

Rachna Kumar,
Financial Professional, Prudential Advisors®
CA Insurance License Number 0M12494
The Prudential Insurance Company of America
Phone 248-688-3694
Mobile 248-835-2528
Rachna.Kumar@Prudential.com
http://www.prudential.com/financial-advisors/mi/troy/rachna-kumar

Prudential
Bring Your Challenges®

"Prudential Advisors®" is a brand name of The Prudential Insurance Company of America, Newark, NJ and its subsidiaries. Prudential, the Prudential logo, the Rock symbol and Bring Your Challenges are service marks of Prudential Financial, Inc., and its related entities, registered in many jurisdictions worldwide.
0299734-00001-00

जैचई

कुठेतरी स्मिता पाटील जाऊन तीस वर्षे झाली हे पाहिलं आणि चटकन मला जैचईची आठवण झाली. १९८६ च्या त्याच डिसेंबर महिन्यात ती सुद्धा आम्हाला सोडून गेली.

पुण्याला लहानपणी वाड्यात राहायचो तिथे आमच्या शेजारी एक जोशी कुटुंब होतं. माझे आजी-आजोबा यांच्या वयाचे पपा आणि जैचई आणि त्यांची चार मुले (साधारण माझ्या आईच्या वयाची) जया, मीना, चारू आणि किरण. जैचई म्हणजे थोडक्यात 'जयाची आई'. माझ्या आई-वडिलांचं शिक्षण तसं बेताचं, त्यात मराठी त्यांची मातृभाषा नसल्यामुळे नुसती ऐकून बोलायला शिकलेली. पण नशिबाने म्हणा किंवा योगायोग म्हणा माझ्यावर मराठीचे उत्तम संस्कार घडवणाऱ्या जोशी कुटुंबाचा मी आणि माझी बहीण एक अविभाज्य घटक झालो होतो. माझं त्या घरचं नाव 'पिल्लू' (आता नातवंडं सुद्धा पिल्लू काका म्हणतात, म्हणजे बेबी नंदा वगैरे तसं!). त्यांच्याकडच्या TV मुळे साप्ताहिकी फेम भक्ती बर्वे ते स्टार ट्रेकचा कॅप्टन कर्क आमच्या दृष्टीस पडले. तसेच पुलं, वपु, भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे यांच्या कलाकृतीचा परिचय झाला. माझ्या वाचन-संगीताच्या छंदाचा पाया इथेच रुजला.

तर मी सांगत होतो जैचई बद्दल. उषा जोशी (आधीची बकुल रेगे) तिच्या नावासारखीच अगदी निरागस, भोळी, बालमनाची. एखादी गोष्ट हरवली की 'टपूदेवी टपूदेवी अमुक तमुक पटकन सापडू दे' असं ती म्हणायची ते आता गंमतीचे वाटते. आता कदाचित मी तिला आजी सारखी होती असं म्हणेन कारण आम्ही तिला संबोधायचो देखील एकेरीत. पण तेव्हा नकळत का होईना गुलजारचे शब्द आम्ही पाळत होतो 'प्यार को प्यारही रेहने दो, कोई नाम ना दो'. माझ्या बहिणीवर तिचा अधिक लळा. अगदी कुठलाही पदार्थ मागितला की न कुरकुरता करून द्यायची. मग ते थालिपीठ असो की दाण्याचा लाडू. पोळी ऐवजी तिला भाकरी जास्त प्रिय. तसेच चॉकोलेट सुद्धा. फ्रीझ नव्हता तर बर्फ आणून दूध-कोको पावडर वापरून एकदा कॅडबरी केल्याचं ओझरतं आठवतं.

लाल मिरच्या-हळकुंड, भाजणीचं पीठ दळायला आम्ही आनंदाने तिच्यासोबत कुठल्यातरी ठराविक गिरणीत जायचो. रथसप्तमीला दूध उतवणे, वसुबारसला गायीला खायला देणे, तुळशीचे लग्न या सगळ्यात ती आम्हाला सामील करून घ्यायची. मी ५-६ वर्षांचा असताना 'आपल्याकडे सुद्धा गणपती बसवायचा' असा हट्ट धरला आणि 'म्हणतोय तर बसव, मी सांगते काय काय करायचं ' असं माझ्या आईला धीर देत तिने सगळं रीतसर करवून घेतलं. दुर्वा निवडायला आणि दोरा न वापरता दुर्वेच्या पातीनेच जुडी बांधायला मी तिच्याकडूनच शिकलो. रामशास्त्री, रामराज्य, शेजारी असे जुने प्रभातचे चित्रपट लागले की हमखास ती आम्हाला घेऊन जायची. अनंतचतुर्दशीला मानाच्या पाच गणपतींचं दर्शन घ्यायला तीच आम्हाला लकडीपुलापाशी घेऊन जायची.

स्नेहबंध

साधारण ८३-८४ च्या सुमारास तिला पॅरालीसीसचा अटॅक आला. तिनं कुणाचं काय वाकडे केले होते मला अजून कळत नाही. घरच्यांनी, तिन्ही मुलींनी खूप छान सांभाळलं. पण शेवटी परावलंबत्व आल्यामुळे कधी कधी तिची चिडचिड व्हायची. स्वतः भाकरी थापणं आणि मुलींना सांगणं, शेवटी कुठेतरी जाणवणारच ना? २-३ वर्षे अशीच गेली. डिसेंबर ८६ ला मी दहावीत होतो. वर्गात एकदा निरोप आला कुणीतरी घ्यायला आलंय. आयुष्यात पहिल्यांदा कुणी जवळचं जाण्याचा प्रसंग. घरी येऊन तिचा देह पलंगावर पाहिला आणि रडू आवरेना. आज लिहिताना सुद्धा तेच होतंय.

तीस वर्षं उलटली खरं वाटत नाही. आईच्या तोंडून कधी कधी आपसूक निघतं, जैचईने असं करायला शिकवलं. पॉपकॉर्न करताना तिच्यासोबत केलेल्या ज्वारीच्या लाह्या आठवतात. गणपतीला दुर्वा काढताना अजून जुडी बांधायला दोरा वापरत नाही. गणपतीला आवडेल की नाही ते माहित नाही, पण वाटतं तिला आवडलं नसतं. मग दुर्वेच्या पातीनेच बांधलेली जुडी गणपतीला वाहिली जाते.

- **सुरेश नायर**

Authentic Indian Groceries, frozen foods, pickles.
Proudly serving the Indian community from 2 locations – Canton and Northville

Canton store:44266 Cherry Hill Rd Canton, MI 48187
Phone: 734-844-6702





Northville store - 16991 Ridge Rd,
Northville, MI 48168.
Phone - 248-773-7345

Colorful Egg-shaped Cakes for your Little Bunnies!

Little kids are thrilled to eat food that are shaped in fun shapes and colored in different colors. Be it chapatis cut in little butterflies, pancakes shaped like cars or cakes shaped like eggs!

Step 1 – Saving Egg Shells.

To bake in actual egg shells, first you need to start saving eggs shells. If your household consumes a lot of eggs, it will be easy for you.

1. When you need to use egg for cooking, remember to carefully poke on top of the egg with a skewer back of a spoon to make a small opening big enough to let the egg whites and yellow to come out. Be careful not to crack the rest of the Egg.
2. Then wash the shells thoroughly and soak them in salt water for ½ hr or so.
3. Dry the shells and store them in empty egg cartons. This way they are protected. You can store the cleaned and sanitized egg shells for months. I would say have about 15-20 shells ready to go before you want to make the egg shape cakes.

Step 2 – Prepare Egg Shells for baking

Use a mini cupcake pan to put the egg shells in. You could make use of aluminum foil to make sure the egg shells stay in place and do not tilt. Keep this set up ready so you are ready to pour as soon as the batter is ready.

Step 3 – Make sponge cake batter.

Quick and easy way is to use store bought white cake mix for this purpose. However, I love the sponge cake recipe as given below. If you are baking with kids, you can have them measure ingredients etc to make it a little fun for them.

Italian Sponge cake – (This recipe is combination of various recipes found online)

- 120 grams granulated sugar
- 4 extra large eggs – (Make sure the eggs are at room temp. Separate egg yolk and egg white for extra fluffiness)
- a pinch of salt
- 1 teaspoon grated lemon zest

- 1 teaspoon Vanilla extract
- 120 grams cake flour

INSTRUCTIONS

1. Take the eggs out of the refrigerator ahead of time as the eggs need to be at room temperature. You may also soak them for a few minutes in warm water.
2. Preheat the oven to 325 degrees F.
3. Separate the egg whites and egg yolks
4. Put the eggs yolks, sugar, salt, and lemon zest and vanilla extract in a bowl.
5. Beat the eggs until very fluffy and pale yellow (about 15/20 minutes on medium/high speed if using a stand mixer or a hand mixer).
6. Beat the egg whites till they are very airy and form stiff peaks.
7. Sift the flour on top of the egg mixture, a little at a time, and fold it gently with a wooden spoon.
8. Gently fold in the egg whites. The air incorporated in Egg whites will make sure the cake is light and spongy.

Step 4 - Color batter and pour and bake

1. Divide the cake batter in 3 small bowls. Add food colors of your choice in each bowl to make colored batter. You can mix very gently so the airy texture of batter stays. You could make the batter 1 uniform or mix slightly to keep marble effect.

2. Pour the colored batters in 3 different pastry bags (or a zip lock bag) Cut the corner and pour little quantities at a time in the egg shells.

3. Make sure the eggs are only filled 3/4th leaving room for the batter to rise.

4. You could make 1 colored eggs or multicolored eggs by alternating the colors.

5. Bake for 20 minutes or until a toothpick inserted into the center comes out clean. It is quite possible that the cake batter will ooze out while baking. No worries! The cake scraps are as delicious as the cake itself.

6. Take the muffin pan out of the oven and let them cool completely.

7. Once the shells are cooled completely, peel the eggs gently to reveal the beautifully covered egg shaped sponge cake. Peel the egg shell carefully and enjoy the cakes!

- **Ketaki Joshi**

CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991

Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?

If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412

Owned and Operated by the Walvekar Family
20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.
www.centralhomecare.com

गझलकार सुरेश भट



माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी;
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा.

किती साध्या सोप्या वाटतात या ओळी समजायला पण किती प्रगल्भ आहेत. नाही ?
वाचल्यानंतर किती तरी वेळ रेंगाळत राहतो हा शेर माझ्या मनात. खरंच हा जादुई गझलकार सूर्यासारखा माझ्या मनाच्या मध्यरात्री तळपत राहिला.
कुमारभारतीत भटांची कविता होती,

गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे ।
आणीन आरतीला हे चंद्र सूर्य तारे ।

तेव्हा या कवितेची डेप्थ कळली नाही, पण टीनेजरी वर्षांमधून बाहेर पडले तेव्हा हळूहळू भटांच्या प्रत्येक कवितेची ओळख व्हायला लागली. अक्षरशः भटांची प्रत्येक गझल एक मास्टरपीस वाटत गेली. आणि या तरल कवीने माझ्या मनावर कायमचा ठसा उमटवला. खालच्याही ओळी याच धाटणीतल्या. किती तरुण रक्त सळसळ करायला लावणाऱ्या आहेत. स्फूर्ती देणाऱ्या तर आहेतच, पण खडबडून जागं करणाऱ्याही आहेत.

मराठ्या उचल तुझी तलवार
एकिची उचल तुझी तलवार
शपथ तुला — आईच्या दुधाची
घेउ नको माघार, मराठ्या....

तारुण्याच्या पहिल्या पायरीवर असताना तर भटांची प्रत्येक गझल माझ्या मनातल्या अबोल शब्दांचं प्रतिबिंब वाटायची. प्रत्येक शेर जणू माझ्या मनात डोकावून तर लिहिलेला नसावा असं वाटायचं! भटांच्या शब्दांत चपखल बसावी इतकी उच्च माझी भावना नक्कीच नाही, पण का कोण जाणे, भंगलेल्या भाव भावनांचा अभंग आरसा होती ही गझल. आता हाच शेर बघा ना;

'कोवळ्या लावण्यगंगेच्या मिठीमाजी बुडालो,
बावरे पाते जिवाचे काप-या श्वासात हाले'.

'कोवळ्या लावण्यगंगेच्या' हे शब्द किती समर्पक आहेत. नाही ? कोवळेपणा तर आहेच, पण 'गंगेचं निर्मळ, सोज्वळ पावित्र्यही आहे. भटांनी प्रत्येक भावनेला किती तरल शब्दांत सांगितलंय. उच्चकोटीच्या प्रेमाची भावना असावी तर अशी.

तरुण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का रे
एवढयातच त्या कुशीवर, तू असा वळलास का रे

ही कविता माहिती नसली तरच नवल. कविता वाचताना असं वाटतं किती वाहतोय शृंगार रस या कवितेतून. पण खरं तर ही कविता भटांनी एका धारातीर्थी पडलेल्या तरुण सैनिकाच्या पत्नीसाठी लिहिली आहे. मृत्युशय्येवर निजलेल्या तिच्या पतीला ती विनवणी करत आहे असा या कवितेचा गूढार्थ आहे. आपण कधी प्रेमभावनांची इतकी

खोली गाठली असावी का? हे फक्त भटांनाच जमो! तूर्तास तर आपण कवितेचा गूढार्थ समजून घेण्याचा व्यर्थ प्रयत्न करायचा आणि हृदयातून वाहवा द्यायची.

काही दिवसांपूर्वीच भटांची एक कविता ऐकली. ती संगीतबद्ध केलीये हृदयनाथ मंगेशकरांनी आणि गायलीये लता मंगेशकरांनी. काय त्रिकुटी जुळून आलीये. कवितेतला एक शेर आहे,

"मग माझा जीव तुझ्या वाटेवर वणवणेल,
अन् माझी हाक तुझ्या अंतरात हुरहुरेल..."

आता याची सुरुवातच पहा ना. त्या 'मग' शब्दाच्या आधी जे काही सुप्त आहे ते कळायला काही मार्ग नाही आणि तेच मनात टोचत राहतं आणि ही कविता वाचकाच्या मनात घर करून बसते. एकमेवाद्वितीय वाटतो हा शेर मला. आपण गूढार्थापासून पुन्हा अनभिज्ञच.

प्रत्येक कविता ही अविष्कार आहे. त्यात मनात येणाऱ्या असंख्य, अगणित भावनांचा चित्रण आहे. तुमच्या माझ्या सारख्या तरल मनाच्या माणसांना भटांनी किती आनंद दिलाय सांगता येणार नाही. प्रत्येक शेर हा उत्कट शेवटाकडे जातो. आता खालचाच शेर बघा ना. अशी तुमचीही झाली असेल कधी स्थिती. दुसऱ्या ओळीत हा शेर मनाला तोडून टाकतो. अर्धवट शेवटाचं काहूर मनात ठेऊन.

एक रान श्वासांचे एक रान भासांचे,
भिरभिरे कुण्या रानी विद्ध पाखरू माझे

भटांना मी कधी कुठे पाहिलं नाही ना कधी भेटण्याचं भाग्य लाभलं. वाईट या गोष्टीचं वाटतं की त्यांना मी कधी माझ्या मनात त्यांच्याविषयी असलेला आदर पत्राद्वारे का होईना सांगू शकले नाही. माझ्या आयुष्यात कवितेची गोडी लावणारे भटच. मराठी साहित्याबद्दल आकर्षण निर्माण करणारेही तेच. माझ्या सारख्या मराठी मनाच्या श्रोत्यांसाठी किती काही देऊन गेलेत सुरेश भट. एकटेपणात, सोबतीला गझल देऊन गेलेत. भावगीतं देऊन गेलेत. आणि न विसरता उल्लेख करण्यासारखं मराठी अभिमान गीतही देऊन गेलेत. फक्त गरज आहे माझ्या तुमच्या सारख्यांनी भटांची ही गझलेची ज्योत तेवत ठेवण्याची.

सूर्य केव्हाच अंधारला यार हो
या, नवा सूर्य आणू चला यार हो

- **मानिनी देशपांडे**

स्नेहबंध

मी पाहिलेला संभा मामा

माझं आजोळ पंढरपूर तालुक्यातील मोडनिंब. आई नेहमी दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये आजोळी घेऊन जायची. आजोळी गेल्यानंतर खूप खूप मजा यायची. आजी नेहमी नवीन पदार्थ करून आम्हाला पोटभर खाऊ घालायची. आजी एकटीच असायची मोडनिंबला, तिच्या सोबत म्हणून संभा मामा असायचा.

संभा मामा हा माझ्या धाकट्या मामाचा वर्गमित्र. हा संभा मामा अपंग होता. म्हणजे दिसायला धड-धाकट, उंच, सावळा, कुरळे केस, दाढी व्यवस्थित केलेली, पण तो हाताने अपंग होता. त्याचा एक हात काम करत नव्हता. त्याच्या एका हाताला पोलिओ झाला होता. तो रोज सकाळी आमच्या घरी यायचा. घरी आल्यानंतर आजी त्याला चहा करून द्यायची. मग तो आजीला बाहेरून भाजी आणून देणे, किराणा, औषधे आणून देणे अशी छोटी मोठी सर्व घरातील व बाहेरची कामे करून द्यायचा.

एके दिवशी मी माझ्या आईला त्याच्याबद्दल विचारले की आई तो रोज आपल्या घरी का येतो आणि आजीला मदत करतो. तेंव्हा आई म्हणाली की त्याला आई नाही. त्याची आई लहानपणी देवाघरी गेली आणि त्याला सावत्र आई आहे. ती त्याला खूप त्रास देते. आजीला तो त्याच्या आईच्या रूपात पाहतो. तो तीस वर्षांखाली B.A., M.A., B.Ed. ही झाला होता. तो शाळेमधे किंवा बँकेमधे, चपरासी किंवा शिक्षक अशी नोकरी शोधत होता. तो रोज सकाळी आल्यावर आई विचारायची, “संभा झालं का रे काम? मिळते का नोकरी, कुठे कोणी ओळखीचं माणूस काम करतंय का तुझं?” तो रोज सांगायचा, “आज बँकेमध्ये गेलो, interview दिला, उद्या इकडे जाणार आहे बघू काय होतंय”.

तो आम्हाला बाहेर घेऊन जायचा. सर्व गावामधे आमची ओळख सुरेखाची मुलं आहेत अशी ओळख करून द्यायचा. खूप दिवस त्याला नोकरी मिळत नव्हती. तो वयामधे आला होता. त्याची आई लग्नासाठी मुली शोधत होती. नोकरी नाही, पैसे नाही तरी लग्न करणार असे म्हटल्यावर मलाच दहा वर्षांची असताना प्रश्न पडायचा की याचे कसे होणार? जे कोणी चांगले लोक त्याच्या सहवासात होते त्यांनी जी काही छोटी-मोठी मदत केली असेल ती त्याची कमाई. माझ्या आजीला चार मुलं व चार मुली. माझा मोठा मामा इंजिनिअर होता व contractor असल्यामुळे मोठ्या गावात घरांची buildings तो बांधत असायचा. मग एके दिवशी आजीने संभा मामाची काळजी व्यक्त केली तेव्हा मामाने त्याचा मित्र डॉ. अबक हा जो त्याच गावामधे होता त्याच्याकडे विनंती करून संभा मामाला कम्पाउंडर ची नोकरी लावून दिली. मग तो रोज कामामध्ये व्यस्त झाला.

रोज येणारा संभा मामा काही काही दिवसांनी आमच्या घरी येऊ लागला. तरीही तो मदत नेहमी करायचा. अतिशय कष्टाळू, दयाळू, बुद्धीमान व समंजस होता. काही दिवसांनी त्याचे लग्न झाले. प्रत्येक दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीला गेलो की त्याची भेट व्हायची व त्याच्याबद्दल सर्व ऐकायला मिळायचे. त्याची बायकोही हुशार व चतुर होती. तीही त्याला खूप कामे सांगायची, त्याच्याशी भांडायची. काही दिवसांनी त्याला मुले झाली. त्याला बँकेमधे नोकरीही लागली होती. मग बाहेरील चांगल्या वाईट लोकांच्या संगतीत राहून त्याला व्यसन लागले. तो

चांगला माणूस लोप पावून राक्षसी वृत्तीकडे जाऊ लागला. त्याला काही दिवसांनी वेड लागले. असा तो संभा मामा आताही माझ्या स्मरणात आहे. संभा मामाने आमच्या कुटुंबाला सुखात-दुःखात खूप मदत केली. तो अजूनही माझ्या व माझ्या भावंडामधे मोठ्या मनाचा माणूस म्हणूनच ओळख टिकवून आहे. त्याने माझ्या मनामधे जी त्याची स्वतःची जागा निर्माण केली आहे ती कधीही पुसट होणार नाही. त्याने मला मदत करणे, निष्पाप प्रेम करणे, स्वार्थाविना काम करणे हे जे सर्व अंगगुण दाखवले ते मी कधीही विसरू शकणार नाही. आपल्यालाही संभा मामा आवडेल अशी अपेक्षा करते.

- **मयुरा कापसे**

My Son the Rock Star – An Immigrant's Diary

It was late afternoon in our suburban Detroit home. As I walked down the stairs from my bedroom I heard the familiar beginning of “Hallowed be thy name” by Iron Maiden, “I’m waiting in my cold cell when the bell begins to chime….” And then came the guitar harmony with the notes I had heard hundreds of times before. For some reason the sound of the guitars seemed richer for the cheap PC speakers the CD was being played on. I walked towards the den to look and there he was, my sixteen year old son playing along note for note. I stood transfixed in the doorway watching his fingers flying over the fretboard of the inexpensive Ibanez we had bought for him a few months ago. Not a particularly rare occurrence in these United States the land of sex, drugs and rock and roll but we, my wife and I are immigrants from India. A group more known for doctors, IT professionals, motel owners and spelling bee champions! As far as music goes, India evokes the vision of sitar music made famous by the great maestro Ravi Shankar referred to as the godfather of world music by George Harrison. Then there is Indian classical music with its extremely long renditions with subtle variations, definitely an acquired taste. Finally there is Bollywood music with its simple rhythms and high pitched female voices so popular in ethnic restaurants.

We did not emigrate from the land of our ancestors to escape persecution or conflict or lack of opportunities which seems to be a common theme for most immigrants since the pilgrims first landed on Plymouth Rock. In the India we grew up in going abroad for whatever reason was just one of the things people did. “Foreign Returned” was often touted as a qualification and could mean anything from a short sightseeing trip to Sri Lanka all the way to having spent several years working in the US, UK, Japan, Germany or Australia. The only dramatic event of our journey was the encounter with the visa officer at the American consulate in Bombay (as it was still called in the 80s). We came as students with undergraduate degrees to attend graduate school, me in Texas and my wife, actually fiancée at that time, in Milwaukee. We supported ourselves mainly through assistantships so no student loans! My wife to be graduated with a Masters in Computer Science from Marquette University and we got married the same week in Fond Du Lac, WI. The happenings at the wedding are a whole nother story which I will get into a little later. She moved to Texas where I was going to graduate school at Texas A&M – home of the fighting Aggies. My wife found a job with the Texas Transportation Institute which was on the university campus. With my assistantship and her salary we lived in relative comfort in the small university town of College Station, TX.

We decided to start a family and within a year of our marriage my wife was pregnant with our first child. Not a very common situation amongst the community of students’, especially Indian students, so we did feel a little out of place, but most of our friends showed great care and compassion. I had to trade in my motorcycle for a used Peugeot and a diesel one to boot. It was a rather strange choice given the fact that there was only a couple of gas stations that even sold diesel in College Station, but the nice family we bought it from took off an additional $200 when we told them about the pregnancy and the fact that a motorcycle was our only

mode of transport. I read somewhere that the only tragedy about Canada is that they could have had American technology, British culture and French food; instead they ended up with American culture, British food and French technology! After owning that car I get the part about French technology, it wasn't a bad car but the mechanical engineer in me was not too impressed with some of the design choices. The car served us well, it had a manual transmission so my wife learned to drive "stick shift" and the other benefit was that we did not get too many requests for borrowing the car from friends. We even got rear ended by a young lady who caused some cosmetic damage but her insurance paid us almost half of what we had paid for the car in the first place. We were pleasantly surprised by the eagerness of the insurance adjuster to give us the money because we had not yet been exposed to the litigious nature of American society. Later on we were told that we could have gotten a lot more out of the accident given that my wife was very pregnant but as they say, no harm no foul.

What I remember today about that time are the Lamaze classes, our daily lunches together and our navigating through the totally alien experience of a pregnancy in an alien land with practically no family support. Back home in India my mother was running her own maternity hospital and my wife's family also had uncles and aunts that were gynecologists and surgeons. Coincidentally my sister-in-law was also going through a pregnancy in India at that time and we were kept updated about her experiences through phone conversations, letters, and mailed photographs. Yes that was just before the internet and digital photography and more than a decade before social media. The correspondence from home describing the various Hindu rituals and ceremonies that go with a pregnancy used to leave us a little depressed but we had made our bed and we had to lie in it! My mother-in-law, bless her heart, made the long trip from India and arrived a few weeks before the due date to help us with the pregnancy. Our son was scheduled to arrive in this world on or around Christmas day, we always knew it was going to be a boy which was confirmed by the ultrasound and all the other tests based on conventional wisdom. If the baby is carried high it is a boy, if the mother has a craving for spicy food it is a girl, etc. He dragged his feet through Christmas and through New Year's Eve, and finally made an appearance in the first week of January just a day before the doctor scheduled an appointment to induce. He was born at 5 in the early morning after making us stay up all night. It was a harbinger of what we were destined to experience all through his high school years and beyond. He was born with a Texas sized personality but not a Texas sized stature. We named him Ameya which means boundless or infinite in Sanskrit, an ancient language that most Indian names originate from. In hindsight we should have looked up the word for boundary-less and used that instead because he never respected boundaries growing up, not the ones that were important to us at any rate, a marked contrast from his twin sisters that were born 8 years later, so we have experienced both ends of the spectrum which has given us a more philosophical perspective in the raising of children.

So this is Ameya' s story as a first generation American and our story as immigrants who have chosen to make our life in this great country. It is not an inspirational tale of success nor a tragic tale with the purpose of evoking sympathy from the reader or even a humorous account about "Life in these United States" but it embodies the quintessential American platitude of "you can be whatever you want to be". At its best it provides a different perspective to "crazy

Asian parents" who are not satisfied with their own demonstrated successes as immigrants but want to manage their children's' lives to be even more successful and at its worst it is a chronicle of Ameya's journey so far as a budding musician who is willing to risk a comfortable middle class life to pursue his dreams. The certainty of the achievement of a middle class lifestyle is based on the examples of his contemporaries that have pursued more "sensible" career paths such as medicine, engineering, law, management, etc. and have achieved financial independence in their early 20s. Notwithstanding the constant barrage from the experts that the American dream has become unattainable for a lot of people, it is still quite within reach especially for kids of Indian immigrant parents. The risk, as I see it, is in the achievement of a sterile suburban lifestyle which we seem to have accomplished – a steady well-paying job, a single family home in the suburbs, employing the television as one's window into "American life", the annual vacations and looking forward to retirement.

I often wonder about the nature versus nurture question when it comes to the path Ameya has chosen. My wife is of the firm opinion that his choice was primarily driven by the nurturing I provided and the micro-messages I transmitted during his growing up. It is worth mentioning at this point that I have been endowed with meager talents when it comes to music, which I will get into in one of the subsequent chapters, which may be in part responsible for my concentration on the development of the musical side of my son's personality growing up. My rationale was that he exhibited above average talent in music as a child and was at the shallow end of the pool when it came to sports or extracurricular academics so the smart thing was to focus on enhancing his strength area rather than push him to conform to the path that many of our friends' children were taking. I remember hearing a discussion on the radio about a book called "Friday Night Lights: A Town, A Team, A Dream" based on high school football in Odessa, TX. The analysis of one of the participants in the discussion was that the book highlighted the desire of fathers to live vicariously through their sons and push them to achieve the dreams that they themselves could not. I admit I never actually read the book but the idea is not exclusive to that particular book. We often see our children as copies of ourselves and want to control their lives and direct them to emulate our successes and steer them away from our failures. I never in my wildest dreams saw myself as being any kind of professional in the music industry which debunks the "Friday Night Lights" theory right of the bat. I have heard many people say that one should follow one's passion and I believe it to be true but the problem is most people don't have a passion that they are willing to risk their life on. So when I was confronted by Ameya's choice to become a musician I could not help but support it. My wife also supported it but grudgingly not because she had anything against music in particular but because she did not see it leading him down an easy path to stability in his life. I will let the readers decide for themselves whether I made the right choice as a parent and hopefully provide some insight into the age old dilemma of should we let our children follow their dreams even if we know that the road is going to be fraught with pitfalls and perils.

- **Rajeev Kalamdani**

रसिका तुझ्याचसाठी

अनेक वर्षांपूर्वी डेट्रॉईटमध्ये डॉ आनंदीबाई जोशी यांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारा एक आगळावेगळा एकपात्री कार्यक्रम सादर झाला. ते नाटक नव्हतं, भाषण नव्हतं, पाडव्यानंतर आणि गणपतीच्या आधी तो कार्यक्रम इथे दाखल झाला. त्यासाठी रंगमंच, जागा मिळवणं, मराठी मंडळाच्या वेळापत्रकाच्या कोष्टकात तो बसवणं हे आयोजकाला - महेश कोटणीसला - कठीण वाटू लागलं. पण ही संधी त्याला सोडायची नव्हती म्हणून त्याने स्वतः जबाबदारी घेऊन तो कार्यक्रम घडवून आणला. त्या अनुभवातून एक नवा कलामंच जन्माला आला. महेश, नितीन अंतुरकर, अमित मेहता यांच्यासारख्या हरहुन्नरी मराठीप्रेमींच्या लक्षात आलं की कलेच्या व भाषेच्या चाकोरीबाहेरच्या आविष्कारासाठी एक वेगळं व्यासपीठ हवं. त्यावेळी अभिजित भुसारी मराठी मंडळाचा अध्यक्ष होता. त्याच्या प्रोत्साहनाने काही मंडळी पुढे आली आणि डेट्रॉईटवासियांना एका नव्या उपक्रमाचा लाभ झाला. त्या उपक्रमाचं बारसं केलं भारती मेहेंदळेने: “रसिका तुझ्याचसाठी”

तुम्हाला दूरदर्शनवर गाजलेले 'गजरा' किंवा 'प्रतिभा आणि प्रतिमा' हे कार्यक्रम आठवतात का? तसेच इथले Saturday Night Live सारखे प्रहसनात्मक कार्यक्रम? कुठल्याही संज्ञेत न बसणारे तरी कलाक्षेत्रात प्रमाण म्हणून मानले जाणारे हे ठेवे आहे. ना धड नाटक, ना परिसंवाद... चाकोरीत बसत नाहीत म्हणून ते सादर करणं कठीण जातं. त्यासाठी स्वतंत्र मंच (platform) हवा. दुसरी गोष्ट अशी की मंडळ अनेकदा खर्च व यातायात करून भारतातून कलाकार आणते परंतु दोन-तीन दशकं इथे काढल्यावर आपली अभिरुची बदलेली असते. या कर्मभूमीत रुजलेल्या सहप्रवाश्यांना आपली कला सादर करावीशी वाटते, आपले अनुभव कथन करण्याची इच्छा होते , गप्पांद्वारे आपले मनोगत व्यक्त करावं हे जाणवतं - त्यासाठी अनौपचारिक बैठक मांडणं हाही एक हेतू आहे.

तर वाचकहो, तुमच्यातील सुप्त कलाकाराला हे आवाहन आहे. 'रसिका' साठी आम्हाला तुमची साथ हवी आहे. आता तुम्ही विचाराल; असं खास आम्ही काय करू शकतो? तर वानगीदाखल आतापर्यंत काय घडलं त्याची झलक बघा ....
स्वलिखित ऐतिहासिक नाट्यप्रवेश, कवीने केलेले स्वत:च्या कवितांचे वाचन व गायन, नवप्रकाशित पुस्तकातील उतारा वाचन, राजकीय घटनांवर आधारित छोटे प्रहसन (skit), मुलाखत, एका बिकट प्रवासाचं प्रकाशचित्रांद्वारे वर्णन, कथाकथन, वादग्रस्त चित्रपटातील भाग दाखवून त्याविषयी चर्चा व परिसंवाद ....

मधल्या काळात BMMचे वारे वाहू लागले आणि रसिकांसकट सर्वांचे लक्ष तिथेच खिळले. आता मंडळाचा आवाका वाढला, दशकानुसार एक अशा मोजल्या तर मराठी भाषिकांची आता पाचवी पिढी इथे स्थाईक होते आहे ....
त्यातील पहिल्या पिढीच्या शिलेदाराला मानाचा मुजरा करत शुभदा शास्त्री यांनी 'कांचनसंध्या' ही Sitcom लिहिली आहे. तिचा पहिला भाग मार्चमध्ये सादर झाला आणि 'रसिका तुझ्याचसाठी' उपक्रमाचे पुनरूज्जीवन झाले.

‘कांचनसंध्या’ ही ज्येष्ठ नागरिकांची वसाहत आहे. बा. भ. बोरकरांच्या 'कांचनसंध्या' कवितेतील "दिवस जरेचे आले जरि त्या काठ जरीचा लावुं सुखें" या उक्तीनुसार या वसाहतेतील स्त्रिया (पहिल्या भागात फक्त स्त्रियांचाच अड्डा दिसतो) आपले भले बुरे अनुभव घेऊन उर्वरित आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने बघत आहेत. त्यांच्या गप्पांमध्ये नर्मविनोद आहे, मध्येच (चवीपुरता) पाचकळपणा आहे, सुख दु:खाच्या गोष्टी आहेत आणि हसवता हसवता डोळ्याचा कांदा ओलावण्याची क्षमता आहे...

'रसिका तुझ्याचसाठी' च्या आजीमाजी व सद्य fans साठी एवढी झलक पुरे, नाही का?

- **ज्योत्स्ना दिवाडकर**

फेरीवाला

नेहमीप्रमाणे YouTube वर जुनी गाणी शोधत असताना सुमारे पन्नास वर्षांमागचं एक popular बालगीत मिळालं..

“आला रे आला
आला आला फेरीवाला
भवती बालगोपाळांचा मेळा जमला..”

अगदी संपूर्ण (animated version) गाणं ऐकलं आणि मन भूतकाळात जाऊन आमच्या आवडत्या फेरीवाल्यांच्या आठवणीत रमलं. या आठवणीतला पहिला फेरीवाला म्हणजे सिनेमावाला .

या सिनेमावाल्याची आठवण अगदी साठ वर्षांमागची. हा सिनेमावाला फिरतं थिएटर गळ्यात घालून दारोदारी फिरत असे. हे थिएटर म्हणजे एक पितळेच्या पत्र्याचा बॉक्स होता. त्याला तीन गोलाकार काचेच्या खिडक्या होत्या आणि त्या खिडक्या पत्र्याच्या गोल झाकणाने बंद केलेल्या असायच्या. एक आणा दिला की ते झाकण उघडून सिनेमा पाहायला मिळायचा. आम्ही ज्याला सिनेमा म्हणत असू ती एक चित्रफीत असायची. अनेक चित्रं एकमेकांना जोडलेली असायची आणि तो हॅन्डल फिरवायला लागला की ती पुढे सरकायची. एक राजाचं चित्रं यायचं, त्यानंतर राणीचं, मग ताजमहाल, त्यानंतर मोटार, नंतर कुतुब मिनार, वगैरे वगैरे. हे चित्र पुढे सरकत असताना फेरीवाला गाणं म्हणत असे ... दिल्लीका राजा देखो रे, राजकी रानी देखो रे, रानीका बंगला देखो रे (ताजमहाल), बंगलेमे मोटर देखो रे, दिल्लीका कुतुबमिनार देखो रे. पहिल्या चित्राचा दुसऱ्या चित्राशी काही संबंध असावा असा नियम नव्हता. शेवटचं चित्रं बघून झालं की तो घंटा वाजवीत असे आणि गोल झाकणं पुन्हा खिडक्यांवर जाऊन बसत. तसं पाहायला गेल्यास हा primitive stage मधला view master plus फेरीवाल्याची commentary बोनस म्हणून. पुढे सात आठ वर्षानंतर view master बाजारात आले आणि फेरीवाला यायचा बंद झाला. हा view master म्हणजे रंगीत चित्रांची disc mechanical lever ने पुढे सरकायची आणि magnifying लेन्स मुळे enlarged चित्र दिसायचं.

आणखी एक सर्वात जास्त तग धरलेला आणि अजूनही तेवढाच, जगभर लोकप्रिय असलेला फेरीवाला म्हणजे फुगेवाला. एका बांबूच्या पट्ट्या जोडून केलेल्या panel वर जास्तीत जास्त खेळणी अत्यंत शिताफीने रचणारा original storage expert. वेगवेगळ्या फुग्यांबरोबर वाऱ्याने फिरणारी चक्रं (pinwheel), वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांची डोकी उठवणाऱ्या पिपाण्या , जादू, रंगीत चष्मे, प्लास्टिक maze आणि शोभादर्शक(kaleidoscope) या वस्तू strategically रचलेल्या असायच्या. माझ्या आवडीच्या वस्तूंमधली सर्वात आवडती वस्तू म्हणजे रंगीत चष्मा. पुठ्ठ्याच्या , पाऊण इंच रुंदी आणि एक इंच व्यासाची नळकांडी चष्म्याची rim बनून

रबर बॅण्ड ने जोडलेली असायची. त्यावर लाल रंगाचा transparent paper भिंगाचं काम करायचा. हा चष्मा लावला की सर्व लाल लाल दिसायचं . आणखी एक आवडती वस्तू म्हणजे जादू. १“ x १ १/२ “ काचेच्या तुकड्याला चार बाजूंनी वेगवेगळी चित्रं असलेला कागद जोडलेला असायचा. हा कागद वेगवेगळ्या प्रकाराने दुमडून वेगवेगळ चित्र पाठच्या बाजूस दिसत असे. त्यानंतर एक गोलाकार प्लास्टिकच्या तबकडी मध्ये चक्रव्यूव्ह (maze) असायचं आणि त्यात साबुदाण्याच्या आकाराएवढे चार पाच मणी असायचे. ते सर्व मणी तबकडी हलवून सेन्टर ला आणायचे. हे maze अजूनही पॉप्युलर आहे आणि मुलांच्या goody bag मध्ये खूपदा पाहायला मिळते. त्याशिवाय मिनी पत्त्यांचा कॅट असायचा. पोपटी रंगाच्या बॅकग्राऊंड वर लाल रंगाने 7 o’clock असे लिहिलेले असायचे. बहुधा ही त्यावेळच्या popular razor blade ची जाहिरात असावी.



शोभादर्शकाला आम्ही बांगड्यांचा सिनेमा म्हणायचो कारण यात फुटलेल्या बांगड्यांचे तुकडे वापरलेले असत आणि multiple reflection च्या किमयेमुळे अतिशय सुंदर designs तयार होत असत. याच्या व्यतिरिक्त मेटलच्या लाल, निळे, हिरवे खडे कोंदणात बसवलेल्या अंगठ्या, प्लास्टिकची घड्याळं, गणपतीचं लॉकेट असलेल्या chains आणि बाकीच्या सटर फटर गोष्टी विकायला असायच्या

फुगेवाला आणि सिनेमावाल्या बरोबर आणखी एक खेळणीवाली अधून मधून भेट देत असे. तिच्याकडे फक्त दोन प्रकारची खेळणी म्हणजे वाद्यं असत. एक म्हणजे mini एकतारी पण ती बोटानी न वाजवता एका छोट्या धनुकलीच्या दोरीने वाजवायची. दुसरं वाद्य म्हणजे ओढायचा ताशा. एक पणतीसारखी दिसणारी मातीची वाटी चार चाकावर mount केलेली असायची. त्या वाटीवर जाड पेपर लावलेला असायचा. ती गाडी दोरीने ओढली की चाकाला जोडलेल्या दोन काड्या त्या वाटीवर आपटून ताश्यासारखा आवाज करायच्या. ही दोन्ही वाजणारी खेळणी लोकांची डोकी उठवून टाकायची. १९५७ साली आलेल्या ‘दो आँखे बराच हाथ’ या चित्रपटात संध्या “सैंया झुटोंका बडा” ह्या गाण्यात ही वाद्यं वाजवताना बघायला मिळेल.

आता राहिले खाऊ आणणारे फेरीवाले. त्यातला एक म्हणजे बर्फाचे गोळेवाला. बर्फ किसणीवर किसून त्याचा हाताने दाबून चेंडू करायचा आणि त्यावर लाल, पिवळी, नारिंगी अश्या आकर्षक रंगांची सरबतं ओतून त्यांना सुशोभित आणि सुमधुर करायचा. आम्हाला बर्फाचा गोळा खायची सक्त मनाई होती त्यामुळे माझी हौस मी महाराष्ट्र मंडळाच्या पिकनिक ला बर्फाचा गोळा खाऊन भागवली.

आणखी एक आवडता फेरीवाला म्हणजे म्हातारीचे केस म्हणजेच आपला cotton candy वाला. हा नेमका शाळेतून घरी येताना वाटेत भेटायचा. त्याच्याकडे गुलाबी आणि निळ्या रंगाचा कापूस

असे. कधी कधी तो त्या कापसाचे पक्षी, वाघ, कुत्रा असे आकार करून देत असे. पण ही कँडी घर यायच्या आत संपवून टाकावी लागत असे. सुदैवाने कॉटन कँडी अमेरिकेत easily available आहे.

आणखी एक सगळ्यात महत्वाचा फेरीवाला म्हणजे कुल्फीवाला. हा नेहमी रात्री लोकांची जेवण आटोपली की मगच उगवायचा. त्याचं उशिरा येणं आमच्या पथ्यावरच पडायचं कारण बाबा खूपदा झोपलेले असायचे त्यामुळे विरोध करणारी पार्टी गैरहजर असायची. आमचे बाबा खूपच म्हणजे जरा

जास्तच health conscious होते. आम्हाला रस्त्यावरचं खाण्यास सक्त मनाई होती. हा कुल्फीवाला डोक्यावर एक मडकं घेऊन यायचा आणि कुल्फेsss अशी आरोळी ठोकायचा आणि दोन मिनिटांतच त्याच्याभोवती लोकांचा गराडा पडायचा. मग तो मडक्यातून बर्फात ठेवलेली, aluminium ची कोनाच्या आकाराच्या कुल्फीपात्रातली कुल्फी, जाडश्या पानावर घालून त्याच्या छोट्या चकत्या करून देत असे. ही कुल्फी अगदी अमृततुल्य असे. हा कुल्फीवाला मात्र आमच्या पार्ल्यात अजूनही रात्रीची फेरी घालतो.

भूतकाळात रमावं तेवढं कमीच आहे. लोकांना वाचायचा कंटाळा यायच्या अगोदरच लिखाण संपवलेलं बरं!

- **सुषमा सुखटणकर**

तो राजहंस एक.....!

पिढ्यानपिढ्या सिनेसृष्टीवर आपलं साम्राज्य गाजविणारा, लाखो-करोडोंके "दिलोंकी धडकन".. Angry Young Man, माझ्या आठवणीतला, बॉलिवूडचा शहेनशहा, एक "राजहंस" .. One and only ... फिल्मस्टार, सुपरस्टार - the legend "अमिताभ हरिवंशराय बच्चन"! गेल्या वर्षी आभाळभर शुभेच्छांचा वर्षाव स्वीकारत,अमितजींच्या पंचाहत्तरीचे Twitter messages, Social Media, You Tube वर जणू सर्वत्र धुमाकूळच घालत होते. आणि त्यातला "कुली" सिनेमाच्या चित्रीकरणाच्या वेळी मिळालेल्या जीवनदानाचा आवर्जून केलेला विशेष उल्लेख! ... अगणित चाहत्यांच्या अपरिमित प्रार्थनांना, तेव्हा यश आलं आणि या यशात नक्कीच खारुताईचा वाटा होता तो आमच्या घन:श्यामचा ...अर्थात हे सगळं TV वर बघितलं आणि घनाची खूप प्रकर्षाने आठवण झाली आणि मन पुन्हा एकदा बालपणीच्या आठवणींत हरवलं ....

मुंबईतल्या दादर भागात, आमच्या जवळच्याच एका बिल्डिंगमध्ये एक फ्लॅट सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आरक्षित असे. घन:श्यामचे वडील उच्चशिक्षित असून सरकारी नोकरीत खूप मोठ्या पदावर नियंत्रित होते. कामानिमित्त त्यांची मुंबईला बदली झाल्याने, आपल्या कुटुंबियांसमवेत काही वर्षं तो आपल्या वडिलांबरोबर आणि इतर भावंडांबरोबर तिथे राहायला आला होता. घन:श्यामला सगळेजण प्रेमाने "घना" म्हणत असत. लहानपणीच आई देवाघरी गेलेली आणि त्याची इतर भावंडे देखील मेडिकल-इंजिनियरिंगच्या उच्च शिक्षणात, आपआपल्या विश्वात कायम व्यस्त असायची. फारसा वेळ नसायचा कोणाकडे त्याच्यासाठी. आमच्यापैकी कोणी त्याच्याशी बोललं, किंवा अगत्याने त्याची विचारपुस केली, की घनाच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद ओसंडत असे. इतर अभ्यासू भावंडांसारखीच घनाला देखील लिहायची, वाचायची, टीव्ही बघायची मनस्वी आवड होती. अगदी नियमितपणे, अत्यंत उत्साहाने तो दररोज त्याच्या स्पेशल शाळेत जात असे. आणि खास बात म्हणजे हे "घनासाहेब " म्हणजे ज्येष्ठ अभिनेते -"अमिताभ बच्चन" यांचे जबरदस्त फॅन.. T.V वर चित्रहार मध्ये "सत्ते पे सत्ता", "डॉन" किंवा "नमक हलाल" मधलं 'पग घुंगरू बांध मीरा नाची रे ..' इ. गाणी लागली, की घना एकदम मनापासून आनंदून, सुखावून जायचा. असो.

आज घना खूपच खुश होता. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. अतिशय जल्लोषाने, अगदी बेभान होऊन हातात एक पत्र - सफेद रंगाचा लखोटा घेऊन सैरावैरा पळत होता. एकीकडे तोंडातून लाळ गळत होती आणि जेमतेम कंबरेवरच्या पट्ट्यात लटकवलेली पँट सुद्धा कधीही गळून पडायच्या तयारीत. तर एका पायातली चप्पल देखील जवळजवळ हरवल्यातच जमा. त्याच्या मागून त्याची पत्नी, त्याला आवरायच्या निष्फळ पण अतोनात प्रयत्नांत. अहो घना थांबा .. अहो घना थांबा ... पण घनाला कुठे वेळ होता तिच्याकडे बघायला..? आणि आपली गळणारी लाळ तिच्याकडून पुसून घ्यायला ....? आणि फारसं विशेष काही सोयरसुतक देखील नव्हतं त्याला त्याचं .. महत्वाचा मुद्दा म्हणजे अतिशय सुसंकृत, सुशिक्षित अश्या उच्चभ्रू परिवाराचा हा एक सदस्य. पण लहानपणी पोलियोने पिडीत. मेंदूची पूर्णपणे वाढ न झाल्याने, शारीरिक-मानसिक स्वास्थ्य विस्कळीत असलेला हा एक

स्नेहबंध

विशीतीला मतिमंद तरुण. हाता-पायाची बोटे वाकडी झालेली..कधी भावनांचा उद्रेक झाल्यास, मानसिक संतुलन बिघडून, आपल्या रागावरचं नियंत्रण पूर्णतः हरवून बसणारं, त्या सुसंकृत, सुशिक्षित तळ्यातलं एक कुरूप, वेडं, विकलांग पिल्लू ..."घन:श्याम" उर्फ "घना"!

मला अजूनही चांगलं आठवतंय, मी शाळेत पाचवी/सहावीत असतानाची ही गोष्ट .... २६जुलै १९८२ च्या संध्याकाळी, सुप्रसिद्ध सिनेस्टार अमिताभ बच्चन यांची "कुली" सिनेमाच्या चित्रीकरणाच्या वेळी झालेल्या अपघाताची दुर्दैवी बातमी वाऱ्यासारखी जगभर पसरली. या चित्रपटासाठी, एक फाईट सीन करत असताना सह-कलाकार पुनीत इस्सार यांनी ढकलेल्या टेबलचा कोपरा, अमितजींनी मारलेल्या उडीचा वेळेचा अंदाज चुकल्याने, अनपेक्षितपणे पोटावर येऊन आदळल्याने अमिताभ बच्चन यांना पोटात जबरदस्त दुखापत झाली आणि ते गंभीररीत्या जखमी झाले.... आणि सगळी चित्रपटसृष्टी एकाएकी आपल्या चाहित्या, लाडक्या कलाकाराच्या - अमितजींच्या काळजीने शोकसागरात पार बुडून गेली. या अनपेक्षित अपघाताने सगळ्या प्रोड्युसर्स, डायरेक्टर्स यांच्या पायाखालची जमीनच सरकली होती जणू. अमिताभजींचा जबरदस्त फॅन असलेला आमचा बिचारा घना सुद्धा पार हादरून गेला. दुःख, राग, काळजी सगळ्या संमिश्र भावनांना पूर आला ... आणि पुन्हा एकदा, फ्रिज मधल्या काचेच्या बाटल्या फेकल्याचा आवाज, घरातल्या वस्तू उधळलेल्या, किंकाळ्या, आरडाओरडा .....आणि घरभर काचांचा सडा!

परत दुसरा दिवस.. आणि या ज्वालामुखी सारख्या उफाळणाऱ्या भावनांचा ऊनपावसाळी पाठशिवणीचा खेळ असा चालूच राहिला. एक एक दिवस जात होता. संपूर्ण सिनेसृष्टी, अमितजींचे जगभर पसरलेले फॅन्स दिवसरात्र पूजा-अर्चा, व्रत-वैकल्यात मग्न होते, आपल्या लाडक्या कलाकारासाठी मनोभावे देवाकडे साकडं घालू लागले होते. ट्रक ने भरभरून लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन, मुंबईच्या सिद्धिविनायकाला, नवस आणि गाऱ्हाणी घालू लागल्या. पण हे सगळं बिचाऱ्या घनाच्या आवाक्याबाहेरचं होत किंबहुना त्याला कदापि शक्यच नव्हतं.... पण आपणही अमितजींसाठी काहीतरी करावं, असं त्याला राहून राहून वाटत होतं. पुन्हा एकदा हताश, दुःखी, भावनावश झालेल्या घनाला परिस्थितीशी हार मानणं मंजूर नव्हतं. शेवटी त्याने मनाशी पक्का निर्धार करून आपल्या वडिलांच्या मदतीने, पत्राद्वारे आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. आपल्या मोडक्या तोडक्या अक्षरात एक छानसं पत्र सुपरस्टार "अमिताभ बच्चन" - अमितजींना पाठवलं. तुमची तब्येत लवकरात लवकर बरी होवो, यासाठी देवाकडे मी अहोरात्र प्रार्थना करीत आहे. आपण लवकरच पूर्ण बरे व्हाल असा माझा ठाम विश्वास आहे, अश्या आशयाचं ते पत्रं होतं. त्यात अमितजींचे कुठले सिनेमे त्याला नक्की का आवडतात? हे ही कळवायला घना अजिबात विसरला नव्हता ..एकंदरीत आपल्या लाडक्या, जिवाभावाच्या कलावंताच्या उदंड आयुष्यासाठी, आरोग्य-स्वाथ्यासाठी, देवाकडे तन-मन-धन अर्पण करुन,अगदी मनापासून जीवनदानाची याचना केली होती.. आणि आपल्या शारीरिक-मानसिक अडचणींवर मात करुन, त्या लाखमोलाच्या भावना, ब्रीच कँडी हॉस्पिटल मधल्या ICU वॉर्डमध्ये काही काळ मृत्यूशी झुंजत असलेल्या, त्याच्या लाडक्या अमितजीं पर्यंत पोहोचविल्या ....

जवळजवळ सहा-आठ महिने सहज उलटले असतील या पत्र व्यवहाराला. एव्हाना अमितजींची तब्येत पूर्णतः सुधारली होती. प्रकृतीचा संभाव्य धोका पूर्णपणे टाळला होता. हळुहळू सगळ्यांच्या नजरा, अमितजींच्या चित्रपटसृष्टीतल्या पुनरागमनाकडे लागल्या होत्या. आणि त्याच दरम्यान घनाच्या नावे घरी आलेलं पत्रं त्याच्या हातात पडलं! विश्वासच बसत नव्हता त्याचा, स्वतःच्या डोळ्यांवर.... चक्क अमितजींनी उत्तर पाठवलं होतं, घनाच्या

स्नेहबंध

पत्राचं.....! खूप मनापासून आभार व्यक्त केले होते त्यांनी घनाचे. आज मला तुमच्या निर्व्याज प्रेमाने, मौलिक प्रार्थनांमुळेच साक्षात जीवनदान मिळाल्याचा त्यात स्वच्छ उल्लेख होता. आणि त्यासाठी मी तुमचा आजन्म ऋणी राहीन असं लिहिलं होतं. आणि आठवण म्हणुन सदिच्छा भेट - त्यांचा एक छानसा रंगीत पोस्टकार्ड साईज फोटो ऑटोग्राफ सहित पाठवला होता. स्वर्ग दोन बोटं उरला होता....घनाच्या आनंदाला सीमा नव्हती आज ..!

तसं बघायला गेलं तर जेव्हा हिंदी, मराठी नाटकं -सिनेमे समजायला लागले तेव्हापासून आम्ही पण खूप बढाया मारायचो आणि स्वतःला मोठे फॅन समजायचो "अमिताभ बच्चन"चे ....पण या प्रत्यक्ष घडलेल्या अनुभवावरून जाणीव झाली की .... जेव्हा मृत्यूच्या दारात आपली एखादी पडद्यावरची,लाडकी व्यक्ती झुंजत असते, तेव्हा काय करतो आपण त्या आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी ? ....थोडीशी शाब्दिक हळहळ, काही क्षणैक अश्रू ? आपल्या पैकी कितीजण आपला कामधंदा थोडा वेळ बाजूला ठेवून, लगेच कागद-पेन उचलून, आपल्या सहृदय भावना त्या व्यक्तीपर्यंत पोहोचवायची तसदी घेतात?..... नेहेमीच भेडसावणारा एक साधा-सोपा पण सोयीस्कररित्या दुर्लक्षित केला जाणारा असा हा प्रश्न....!

काही प्रमाणात, समाजाने उपेक्षिलेला, वेळोवेळी आपल्या भावनांचा उद्रेक होऊन देखील आपल्या हृदयाच्या एका छोट्याश्या कोपऱ्यात, आपल्या श्रद्धास्थानांबद्दल विशेष प्रेम, आदर बाळगणारा अमिताभजींचा हा एक मनमौजी चाहता. आपल्या लाडक्या अभिनेत्यावर जीवापाड प्रेम करणारा, एक विकलांग, मंदबुद्धी तरुण ...सगळ्या भावंडांपासून खूप खूप वेगळा ...माझ्या बालपणीच्या आठवणीतला ..आणि त्या सुसंकृत, सुशिक्षित तळ्यातला ..... तो राजहंस एक - "घन:श्याम" उर्फ "घना"!

- **सौ. सरोज प्रशांत जावकर**

घमासान लढाई - नमस्कार या शिवरायाला

(चाल- एहसान तेरा होगा मुझपर)

घमासान लढाई होऊन गेली
रक्ताचे जिथे पाट वाहती
रडण्या कण्हणाच्या शोकामधी
गिधाड पक्षी फडफडती

युद्ध जाहले शंख निनादे
तलवारींचे वार चालती
ते हात कुणाचे, पाय कुणाचे
शिर कापण्या सळसळती

जय-जय काराच्या जल्लोषी
मरणारे पण सुखात मरती
या युध्दाच्या त्या, वार्ता ऐकूनी
माय माऊली थरथरती

वीर मराठे, वीर शिवाजी
जिंकूनी आले, ही लढाई
आज सुखी मी, शिव कृपेने
नमस्कार या शिवरायाला

- **निरंजन हुंबड**

बडबडभवानी

भारतातल्या सखीबरोबरचं फोनवरील संभाषण आटोपतं घेताघेता तिनं बॉम्ब टाकला---

"अगं, तुला मनी कानडे आठवते आपल्या वर्गातली?"
"चांगलीच! मनीला कोण विसरेल?"
"तुला कळलं नसेल ना? कसं कळणार म्हणा----"
"आता सांगतेस का बये?"
"अगं, दोन आठवड्यांपूर्वी गेली बिचारी"
"तरीच पृथ्वीवर जरा शांत-शांत वाटतंय्. आता तरी गप्प बसली असेल का ग मनी?"
मी सुन्नपणे विचारलं.

मनी कानडे! सगळ्या शाळेला, कॉलेजला, वाड्याला, पेठेला चांगलीच माहीत असलेली, सगळ्यांनी भरपूर ऐकलेली वल्ली. परमेश्वराने जन्माला घालतानाच मनीच्या नरड्यात एक ध्वनिक्षेपक घातला होता, अशी माझी खात्रीच होती. मनीचं बाळपण तिच्या आईने कसं निभावलं असेल याबद्दल आम्हाला सर्वांना अमाप कुतूहल व त्या माऊलीबद्दल अपरंपार सहानुभूती वाटत असे. मनी सतत मोठ्याने तोंडाची टकळी वाजवत असे आणि त्याहून मोठ्याने कुठल्याही फुटकळ विनोदाला भरभरून हसत असे. मनी वर्गातच आहे की आमच्या बाईंनी मनीच्या दंग्याला वैतागून तिला कुठल्यातरी कामगिरीवर वर्गाबाहेर पाठवून दिले आहे, हे आवाजाच्या पातळीवरून ताबडतोब कळत असे.

मनी तशी दहाजणींत उठून दिसेल अशी नव्हतीच- पण जोपर्यंत तिला तोंड उघडायची संधी मिळाली नसेल तोपर्यंतच! एकदा का मनीच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला की ती शंभर पोरींना भारी होती. तिच्या या आश्चर्यकारक दैवी देणगीचा आमच्या शिक्षिकांना, आम्हा मैत्रिणींना, तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना अतिशय त्रास होत असे. पण ही क्षुल्लक गोष्ट मनीच्या कधी खिजगणतीतही नसे. दंगा करण्याबद्दल मिळालेल्या विविध शिक्षा ती आनंदाने भोगत असे अन् तत्परतेने विसरूनही जात असे.

फक्त हुतुतूची कॅप्टन असलेल्या सुली चव्हाणने मनीला योग्य तो न्याय दिला होता. अफवा अशी होती की, आंतरशालेय सामन्यांच्या सीझनआधी सुली जवळच्या उसाच्या रसवंतीमधे नेऊन मनीला भरपूर रस पाजायची. त्याबदल्यात मनी प्रत्येक हुतुतूच्या सामन्याच्या वेळी उपस्थित राहून आमच्या खेळाडूंना इतक्या जोराने उत्तेजित करायची अन् प्रतिस्पर्धी खेळाडूंना एवढी नामोहरम करायची की त्या बिचाऱ्या पाsssर दबून जायच्या. आमच्या शाळेच्या हुतुतूच्या संघाच्या यशात एकही सामना न खेळलेल्या मनीचा महत्वाचा वाटा होता.

खो-खो खेळताना, डॉज बॉल खेळताना, चित्रकलेच्या तासाला, शिवणाच्या तासाला- मनीच्या वाक्गंगेला अगदी पूरच येत असे. बरं- हळू बोलेल का भवानी? कायम नुसता भोंगा! एकदा सुप्रसिद्ध लोहोकरे बाई वर्ग शांsssत करून मनापासून हिंदी कविता शिकवत होत्या.
" खूब लढी मर्दानी" वगैरे जोशात चाललं होतं. त्यांच्या नाकाखालीच मनी तिच्या शेजारणीबरोबर लिहून आणि खाणाखुणा करत "बोलत" होती. प्रथेप्रमाणे बाईंनी नेम धरून खडूचा तुकडा फेकला, तो बरोब्बर मनीच्या डोक्यावर टपकन् लागला. प्रथेप्रमाणे मनीने तो खडूचा तुकडा बाकाखालून धुंडाळून बाईंच्या समोर विनम्रतेने

ठेवला आणि खाली मान घालून उभी राहिली. तिची देहबोली अपराधी असली तरी ती हसू दाबण्याचा आटोकाट प्रयत्न करते आहे हे आम्हाला चांगलंच माहीत होतं.

" जा बाळ-- वर्गाबाहेर जाऊन उभी रहा बरं"

मनी आज्ञाधारकपणे वर्गाबाहेर पळाली आणि शक्यतो हळू आवाजात हसत, आपण बाहेर का उभे आहोत, बोलत नसतांनाही बाईंनी आपल्याला कशी उगीचच शिक्षा केली, बाई कशा अन्यायकारी आहेत इ. इ. वर्गावरून येणाऱ्याजाणाऱ्या सर्वांना मोकळेपणाने सांगू लागली. शेवटी बाईंनीच रागारागाने वर्गाचं दार लावून घेतलं- अर्थात मनीला बाहेरच ठेवून! या घटनेनंतर मनीचा भाव चांगलाच वधारला अन् ती चांगलीच प्रसिद्ध झाली.

आम्ही मनीच्यासाठी एक खास घोषणाच तयार केली होती-

"दैनिक मनी--- मूल्य - वाचकांचा वेळ"

हे मनीच्या तोंडावर म्हटलं तरी तिला त्याचं काssssही वाटायचं नाही. तिची बडबड मागील अंकावरून पुढे अशी चालूच रहायची. मी आठवायचा प्रयत्न केला- कशाबद्दल इतकं बोलायची मनी? स्वतःबद्दल तर नक्कीच नाही. पण तिच्याबरोबर दहा पंधरा मिनिटं गप्पा मारल्या की डोकं हलकं व्हायचं, शाळेमधल्या, नंतर कॉलेजातल्या एकूणएक सनसनाटी घटना कळायच्या हे खरं.

कोणीकोणी तिला सांगायचा प्रयत्न करीत---

"मने, अगं, इतकी शक्ती बोलण्यात वाया घालवतेस---- ती अभ्यासात लाव ना जरा! परीक्षेत दिवे लावतेस नेहमी!"

"पण बाई, बोलण्याइतकं सोप्पं नाही ना अभ्यास करणं! आई तर म्हणते की जन्मल्यानंतर रडण्याऐवजी मी बडबडच सुरू केली!"

कॉलेजच्या दुसऱ्या- तिसऱ्या वर्षातच मनीने घरातून पळून जाऊन कोणाशीतरी लग्न केलं. तिच्याशी संपर्क तुटला- की तिनंच तोडला माहीत नाही. मनीचं वैवाहिक जीवन फार दुर्दैवी होतं असं ऐकलं ----

आता ही मनीच्या मृत्यूची बातमी कळली अन् वाटलं ---- मनीच्या घरात, मनीच्या वाड्यात, अवतीभोवती, आता वाहनांचे, पक्ष्यांचे, अंगणात खेळत असलेल्या पोरांचे आवाज छानच ऐकू येत असतील. मनीची बडबड मात्र कायमची शांत झाली असेल!

- **वीणा शाह**

The Future of Coatings
Dhake Industries
GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS
Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market
Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements
Various Paint Technologies
2K Monocoat
2K Base/Clear
1K Waterbase
2K Waterbase
One-Coat over TPO/PP
Adhesion Promoters
Laser-Etchable Coatings
Soft-Touch Coatings
Chrome-Look Coatings
In-Mold Coatings
Hydrographics Clearcoats
Metallic Coating Finishes
Non-Metallic Coating Finishes
Much Much More...
Dhake Industries
Please contact us for more information
Global Headquarters
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ